Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २६३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. २० नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## दिल्ली दंगल सूनियोजित कट होता; उमर खालिद शरजील इमामच्या जामिनास पोलिसांचा विरोध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नवी दिल्ली**

नागरिकत्व सुधारणा कायद्याविरोधातील आंदोलन व २०२० दिल्ली दंगलींशी संबंधित प्रकरणात आरोपी असलेल्या उमर खालिद, शरजील इमाम आणि इतरांनी दाखल केलेल्या जामिन अर्जांवर सुप्रीम कोर्टात गुरुवारी सुनावणी झाली. या दरम्यान दिल्ली पोलिसांनी जामिनाला जोरदार विरोध करत आरोपींवर कठोर टिप्पणी केली.



सुनावणीदरम्यान दिल्ली पोलिसांच्या वतीने हजर झालेल्या अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस. व्ही. राजू म्हणाले की, आजकाल डॉक्टर, इंजिनियर आपल्या व्यवसायात काम न करता देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी होत आहेत. यावेळी राजू यांनी अनेक शहरांमध्ये शरजील इमाम याने दिलेल्या भाषणांचे व्हिडिओ कोर्टासमोर सादर केले आणि म्हटले की, हे साधे आंदोलन नसून हिंसक आंदोलन घडवण्याचा प्रयत्न होता. सीएए विधेयक मंजूर होण्याच्या सुमारास संपूर्ण घटना नियोजित असल्याचेही म्हटले.ते पुढे म्हणाले, आरोपींना मुस्लिमांचा पाठिंबा मिळवण्याची संधी दिसली. आरोपी दिल्लीला होणारा पुरवठा खंडित करू इच्छित होते. आरोपी चिकन नेकच्या (आसामला भारताशी जोडणारा १६ किलोमीटरचा भूभाग आहे) माध्यमातून भारताच्या ईशान्येकडील आसामचा आर्थिकदृष्ट्या गळा दाबू इच्छित होते. या आंदोलनाचा उद्देश लोकांना आवश्यक वस्तूंपासून वंचित ठेवणे हा होता. आरोपीने काश्मीरबद्दल बोलून मुस्लिमांना भडकवण्याचा प्रयत्न केला. तिहेरी तलाकबद्दल बोलून न्यायालयाची बदनामीदेखील केल्याचा आरोप राजू यांनी केला.

राजू यांनी २०१९-२०२० दरम्यान चाखंड, जामिया, अलीगड आणि आसनसोल या ठिकाणी इमामने दिलेल्या भाषणांचे व्हिडिओ दाखवले. या भाषणांचा तपशील चार्जशीटचा भाग असल्याची पुष्टीही त्यांनी न्यायालयाला केली.

## मुख्यमंत्र्यांपुढे ठरलं तरीही फोडाफोडी सुरूच शिवसेनेनं भाजपचा उमेदवार फोडला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०हिंगोली**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीत कुरघोडीचं राजकारण पाहायला मिळत आहे. महायुतीमधील भाजप आणि शिवसेना पक्षात तर महाविकास आघाडीतील शिवसेना आणि काँग्रेसमध्ये तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसात शिवसेना आणि भाजपमधील फोडाफोडीच्या राजकारणाचा वाद चांगलाच रंगला असून थेट दिल्लीपर्यंत पोहोचल्याचं दिसून आलं. शिवसेना मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्लीत जाऊन गृहमंत्री अमित शाहांची भेट घेतली. या भेटीत महायुती, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या तक्रारी केल्याची माहिती आहे. एकीकडे भाजपकडून शिवसेना उमेदवारांना पळवलं जात असल्याच्या तक्रारी असतानाच हिंगोलीत शिवसेनेनंच भाजपचा अधिकृत उमेदवार पळवल्याचं पाहायला मिळालं.



राज्यात एकीकडे भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण हे शिवसेनेच्या नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश घडवून आणत असल्यामुळे एकनाथ शिंदे नाराज असताना हिंगोली नगरपालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांचे विश्वासू असलेले आमदार संतोष बांगर यांनी भाजपचे नगरसेवकपदाचे अधिकृत असलेल्या उमेदवाराला उमेदवारी मागे घ्यायला लावत शिवसेनेत प्रवेश दिला. हिंगोली नगरपालिकेमधील प्रभाग १६ ब मध्ये भाजपचे अधिकृत उमेदवार असलेले भास्कर बांगर यांनी उमेदवारी मागे घ्यायला एक दिवस शिल्लक असताना आज निवडणुकीतून स्वतःची माघार घेतली. संतोष बांगर यांच्याहस्ते त्यांचा शिवसेनेमध्ये प्रवेश झाला असून भास्कर बांगर यांनी शिवसेनेचे उमेदवार श्याम कदम यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे. त्यामुळे, नगरपालिका निवडणुकीतील फोडाफोडीच्या या राजकारणात भाजपला हा स्थानिक राजकारणातील मोठा धक्का मानला जात आहे.

## स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये ‘ईव्हीएम’चा उपयोग करणे वैध आहे का?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० नागपूर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'ईव्हीएम'चा उपयोग करणे वैध आहे का? अशी विचारणा नागपूर खंडपीठाने बुधवारी राज्य निवडणूक आयोगाला करून यावर गुरुवारी प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश दिले.




आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांमध्ये 'ईव्हीएम' सोबत 'व्हीव्हीपॅट'चा उपयोग व्हावा किंवा हे अशक्य असल्यास बॅलेट पेपरद्वारे निवडणूक घ्यावी, यासाठी काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव प्रफुल्ल गुडधे यांनी याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यापुढे सुनावणी झाली.

गुडधे यांचे वकील वरिष्ठ ॲड. फिरदौस मिर्झा यांनी राज्य निवडणूक आयोग मनमानी व निराधारपणे वागत असल्याचा आरोप केला. आयोगाने मंगळवारी न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये 'ईव्हीएम' सोबत 'व्हीव्हीपॅट'चा उपयोग करण्याची कायद्यात तरतूद नाही, अशी माहिती दिली होती. तसेच, या निवडणुकांमध्ये व्हीव्हीपॅट वापरल्यास कायद्याचे उल्लंघन होईल, अशी भूमिका मांडली होती.

### केरळमधील निवडणुकीचे दिले उदाहरण

१९८४ मध्ये केरळ येथे 'ईव्हीएम'द्वारे स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक घेण्यात आली होती. नियमात ईव्हीएम वापरण्याची तरतूद नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने ती निवडणूक रद्द करून बॅलेट पेपरद्वारे निवडणूक घेण्यास सांगितले होते, अशी माहितीही ॲड. मिर्झा यांनी न्यायालयाला दिली.

### युक्तिवाद काय ?

ॲड. मिर्झा यांनी कायद्यातील तरतुदी व निवडणूक नियमांकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कायद्यांमध्ये ईव्हीएम किंवा बॅलेट पेपरद्वारे निवडणूक घेण्याची तरतूद आहे. परंतु, निवडणूक नियम केवळ बॅलेट पेपर वापरण्याची परवानगी देतात.

ईव्हीएम वापरण्यासंदर्भात एकही नियम नाही. असे असताना निवडणूक आयोग 'ईव्हीएम'द्वारे निवडणूक घेत आहे. ही कृती अवैध आहे, असा दावा त्यांनी केला. त्यामुळे न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला 'ईव्हीएम' वापरण्याची वैधता सिद्ध करण्यास सांगितले.

## उद्धव ठाकरे गटात मोठी कारवाई

### पक्षविरोधी ठपका ठेवत तीन पदाधिकाऱ्यांना बाहेरचा रस्ता; हकालपट्टीनंतर असंतोष उफाळला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

राहाता-शिर्डी परिसरात उद्धव ठाकरे गटाच्या शिवसेनेत मोठा राजकीय भूकंप झाल्याचे दिसून आले आहे. पक्षविरोधी कारवाईचा ठपका ठेवत राहाता नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र पठारे, माजी नगरसेवक सागर लुटे आणि नगरसेविका उज्ज्वला होले यांची पक्षातून हकालपट्टी केल्याचा निर्णय जाहीर होताच स्थानिक शिवसैनिकांमध्ये तीव्र नाराजी उसळली. पत्रकार परिषदेत काही निष्ठावंत कार्यकर्त्यांना भावनांनी भरून येत अश्रू अनावर झाले. या तिघांनी नगरपालिका निवडणुकीत उमेदवारीची इच्छा व्यक्त केली होती, मात्र एबी फॉर्मच्या वादावरून त्यांच्यावर कडक कारवाई झाली असल्याचे पक्षाने स्पष्ट केले आहे.



नगरपालिका निवडणूक जवळ येत असताना पदाधिकाऱ्यांवर अशी कारवाई झाल्यामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढला आहे. राजेंद्र पठारे हे नगराध्यक्षपदासाठी इच्छुक होते, तर सागर लुटे आणि उज्ज्वला होले यांनी नगरसेवकपदासाठी तयारी केली होती. मात्र, महाविकास आघाडीचा भाग न बनता तसेच पक्षाचा एबी फॉर्म विनापरवानगी भरल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला. पक्षाचे वरिष्ठ नेते अनिल देसाई यांनी एबी फॉर्म चोरला, असा गंभीर आरोप केल्याची माहितीही समोर आली असून, यामुळे कारवाईची तीव्रता अधिक वाढली.

या घडामोडींवर नाराज गटाने पत्रकार परिषद घेत पक्षातील हस्तक्षेपाबद्दल थेट काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्यावर निशाणा साधला. राजेंद्र पठारे यांनी भावनिक आवेशात टीका करत म्हटले की, ही ठाकरे सेना राहिलेली नाही, तर कोल्हे-थोरात सेना म्हणजेच घढ सेना बनली आहे. काँग्रेस नेत्यांचा शिवसेनेतील उमेदवारी आणि संघटनातील निर्णयांवर वाढता प्रभाव हा मुख्य वादाचा मुद्दा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रहाता-शिर्डी तालुक्यात काँग्रेसचा हस्तक्षेप वाढत चालल्यामुळे निष्ठावंत शिवसैनिकांना दुय्यम स्थान देण्याची पद्धत तयार झाली असल्याचा नाराज नेत्यांचा आरोप आहे.

## नितीशकुमार सीएम पण भाजपचे सर्वाधिक मंत्री एनडीएच्या मंत्रिमंडळात घराणेशाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०पटना**

बिहारमध्ये पुन्हा नितीशराज सुरू झाले आहे. नितीश कुमार यांना दहाव्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलीय. त्यांच्याबरोबर इतर २६ मंत्र्यांना शपथ देण्यात आलीय. जेडीयूला मुख्यमंत्रिपद दिल्याने भाजपने सर्वाधिक मंत्रिपदे घेतलीय. भाजपच्या १४ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतलीय. तर जेडीयूला ९ मंत्रिपदे मिळाली आहे. तर केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्या लोजपाला (रामविलास पासवान) दोन आणि माजी मुख्यमंत्री जीतनराम मांझी यांच्या हम पक्षाला एक मंत्रिपद मिळाले आहे. तर उपेंद्र कुशवाह यांच्या राष्ट्रीय लोक मोर्चाला एक मंत्रिपद मिळाले आहे.



बिहारमध्ये एनडीएला २०२ जागा मिळत स्पष्ट बहुमत मिळाले. भाजपला सर्वाधिक ८९ जागा मिळाल्या. तर नितीशकुमार यांच्या जदयूला ८५ जागा मिळाल्या. तर चिराग पासवान यांच्या पक्षाला १९, जीतनराम मांझी यांच्या पक्षाला पाच आणि कुशवाह यांच्या पक्षाला पाच जागा मिळाल्या आहेत. तर दोन उपमुख्यमंत्रीपद या मंत्रिमंडळात राहणार असून, सम्राट चौधरी आमि विजय सिन्हा हे उपमुख्यमंत्री म्हणून कायम राहणार आहेत.

## ठाकरेंच्या वकिलांनी कोर्टात महत्त्वाचे मुद्दे मांडलेच नाही

### म्हणून एका मिनिटांमध्ये खटला संपला; पृथ्वीराज चव्हाण यांचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०कराड**

शिवसेनेच्या वकिलांना चिन्हाच्या खटल्यामध्ये कोर्टात चुकीचे मुद्दे मांडल्याचे पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे. एका मिनिटांमध्ये हा खटला संपला, निवडणुका झाल्या नाहीत हा मुद्दा मांडायला हवा होता, तो मांडला गेला नाही, असे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी म्हटले आहे. तर स्थानिक निवडणुका होण्यापूर्वी तुम्ही आम्हाला चिन्हाबाबत लवकर निर्णय द्या असेही म्हणायला हवे होते असे चव्हाणांनी म्हटले आहे.



पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, शिवसेनेचा जो खटला झाला त्यामध्ये वकिलांनी चुकीचे अर्ग्यू केले. त्यामुळे सुप्रीम कोर्टात खटला एका मिनिटात संपला. कोर्टाने काय म्हटले की आम्ही जानेवारीमध्ये ऐकतो म्हणजे सर्व निवडणूक संपल्यावर ऐकणार. त्यावेळी मुद्दा मांडायला हवा होता की पक्ष रोजच निवडणुका लढत असतात. पण नागरिक दोनच निवडणुका लढत असतो ती म्हणजे देशाची आणि एक राज्याची. १०-१० वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका झालेल्या नाहीत, भाजप सरकारने ७३ आणि ७४ वी घटना दुरुस्ती पार मोडून काढली आहे.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, त्यामुळे जनतेला आपला नगरसेवक आणि पंचायत समिती सदस्य निवडायचा अधिकार नाहीये पण हा विषय वेगळा आहे.त्यामुळे तुम्ही आम्हाला चिन्हाचा निर्णय लवकर द्या, या निवडणुका होण्यापूर्वी ही बाजू मांडायला हवी होती, ती मांडली गेली नाही. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका १० वर्षे झाल्या नाहीत हे सांगितले का?.

## शहा-शिंदे भेट नाराजीची नव्हे!, बावनकुळे म्हणाले ‘त्या’ बातम्या कपोलकल्पित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नागपूर**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची झालेली भेट ही महायुतीच्या विजयासाठीची रणनीती आणि प्रशासनिक समन्वयासाठी होती. या भेटी वरुन येत असलेल्या नाराजीच्या बातम्या कपोलकल्पित आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे स्पष्ट केले.



ते नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलत होते. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट नाराजीची नव्हती. त्यांच्या भेटीत महायुती ५१ टक्के मतांनी जिंकावी यावर चर्चा झाली, असे बावनकुळे म्हणाले. मी स्वतः दोन दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांना भेटलो. ते कुठेही नाराज नव्हते. एनडीएमध्ये नियमितपणे नेते एकमेकांना भेटत असतात.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या पक्षांतराविषयी ते म्हणाले, समन्वय समितीने एकमेकांच्या पक्षातील प्रवेश टाळण्याचे ठरवले असले, तरी उमेदवारी न मिळाल्याने काही कार्यकर्ते पक्ष बदलतात. माझ्या कामठी मतदारसंघातही असेच झाले. त्यामुळे महायुतीत कुठलीही गडबड नसल्याचे ते म्हणालेत.

## कुंभमेळ्यापूर्वी नाशिकला केंद्र सरकारकडून १०० इलेक्ट्रिक बसेस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नाशिक**

कुंभमेळ्यापूर्वीच केंद्र सरकारकडून महापालिकेला १०० इलेक्ट्रिक बसेस (पीएमपी) मिळणार आहेत. त्यासाठीची सर्व कामे पूर्ण करण्याचे आदेश नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज यांनी दिले. गोविंदराज यांनी महापालिकेतील अधिकाऱ्यांसोबत ऑनलाइन बैठक घेऊन आढावा घेतला. यावेळी त्यांनी प्रकल्पासाठी राज्य शासनाकडून थकीत असलेले चार कोटी रुपयांचे अनुदान लवकर मंजूर केले जाईल असे आश्वासन दिल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.



या इ-बसेससाठी आडगाव येथे डेपो बांधला जात असून वीज जोडणी करण्याचे महावितरणचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. प्रधान सचिवांच्या या सूचनांमुळे नाशिक महापालिकेने कामांना गती दिली आहे. मनपा आयुक्त मनीषा खत्री यांच्यासह अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, सिटी लिंकचे सीईओ विजयकुमार मुंडे आणि इतर अधिकारी बैठकीला उपस्थित होते. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नाशिकची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक पर्यावरणपूरक आणि कार्यक्षम होईल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला.

केंद्राच्या ‘पीएमपी’ योजनेंतर्गत नाशिकला पहिल्या टप्प्यात जानेवारीतच ५० बस मिळू शकणार आहेत. गेल्या वर्षापासून आडगावला १०० बसेससाठीचा अत्याधुनिक डेपो बांधला जात आहे. या डेपोच्या कामासाठी एकूण १७ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. यापैकी केंद्राने ६ कोटी, राज्य शासनाने ४ कोटी आणि पॉवर सप्लायसाठी केंद्राकडून ७ कोटी रुपये असे अनुदान उपलब्ध झाले आहे.

## संपादकीय ......

# 'तडजोड-मंत्र' जोमात...

भाजप - शिंदेंची शिवसेना - राष्ट्रवादी (अजित पवार) यांना केंद्र व राज्यातील सत्तेचा आधार आहे. मात्र नगर परिषद निवडणुकीत स्थानिक पातळीवर तेच घटक पक्ष परस्परांविरोधात उभे ठाकल्याचे चित्र दिसते.

नाशिकसह खानदेशात नगर परिषदांच्या निवडणुकीचे बिगुल वाजले आणि जिल्ह्यातील ११ नगर परिषदांसाठी हजारो अर्ज दाखल होताच संघर्ष अधिक तीव- झाला आहे. या निवडणुकीत पक्षनिष्ठेपेक्षा स्थानिक गणिते, वैयक्तिक गट-तट, सूडभावना आणि येणार्या महापालिका-विधानसभा समीकरणांचा प्रभाव जास्त जाणवत आहे. बहुतांश ठिकाणी महायुती आणि महाविकास आघाडी हे नावापुरते आघाडीचे समीकरण दिसत असून प्रत्यक्षात 'सोयीचे राजकारण' निर्णायक ठरते आहे.

भाजप - शिंदे सेना - राष्ट्रवादी (अजित पवार) यांना केंद्र व राज्यातील सत्तेचा आधार आहे. मात्र स्थानिक पातळीवर तेच घटक पक्ष परस्परांविरोधात उभे ठाकल्याचे चित्र दिसते. येवला येथे शिंदे गट व शरद पवार गट युती करतात, तर सिन्नर व त्र्यंबकेश्वर येथे महायुतीतीलच भाजप, शिंदे सेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट परस्परांशी लढत आहेत. ओझरमध्ये भाजप स्वतंत्र, तर शिंदे सेना व राष्ट्रवादी एकत्र ही विरोधाभासी उदाहरणे मतदारांना गोंधळात टाकणारी आहेत. मुख्य सत्ताधारी आघाडीत एकवाक्यता नसणे ही लोकशाहीतील दुर्भाग्याची बाब म्हणावी लागेल.

खानदेशातही चित्र वेगळे नाही. जळगावमध्ये भाजप नेते गिरीश महाजन आणि शिंदे शिवसेनेचे आमदार किशोर पाटील यांच्यातील संघर्ष तीव- होत आहेत. महायुती अंतर्गतच टक्कर 'सत्ता समन्वया'ऐवजी 'इगो समन्वया'वर चालली, असे स्पष्ट होते. चोपड्यात अजित पवार व शरद पवार गटांची भाजपसोबत अजब युती, तर चाळीसगाव येथे भाजप स्वबळावर आणि त्याविरोधात चार घटक पक्षांची प्रस्तावित युती या राजकीय 'सरमिसळीत' मतदारांच्या विचारपूर्व निर्णयक्षमतेची कसोटी लागणार आहे.

या संपूर्ण घडामोडीत सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आदर्श, धोरण, विचार, विकास आणि पक्षनिष्ठा यापेक्षा सध्याच्या राजकारणात वैयक्तिक मर्जी, गटाचा दबाव, जिंकण्यासाठी कुणासोबतही हातमिळवणी आणि राजकीय पुनर्वसन हेच निकष दिसून येत आहेत. शहर विकास, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते, वाहतूक व्यवस्थापन या मूलभूत गरजा केंद्रस्थानी असायला हव्यात. पण त्याऐवजी नगर परिषदेच्या निवडणुकीतही सत्तापालट, वर्चस्व, सूड आणि प्रतिमासंघर्ष याचीच हवा आहे. युती, फूट आणि गटातटांचा खेळ जसजसा वाढत आहे, तसतसे राजकीय स्थैर्य व प्रशासनिक सातत्य यांच्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. निवडणूक जिंकण्यासाठी स्थानिक लाभ, वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि तात्पुरते करार करण्यात येत आहेत. मात्र मतदारांना याचा थेट परिणाम पुढील पाच वर्षांत दिसेल.

नगर परिषदेच्या निवडणुकीत पक्ष नेते, मंत्री, खासदार किंवा आमदार यांची ताकद उपयोगी पडलीच पाहिजे असे नाही. अनेक ठिकाणी स्थानिक कार्यकर्त्यांची प्रतिमा, कामाचा ट्रॅक रेकॉर्ड आणि नागरिकांशी दैनंदिन संपर्क अधिक निर्णायक ठरतो. त्यामुळे या निवडणुकीचा निकाल फक्त राजकीय नकाशा बदलेल असे नाही, तर आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि महापालिका निवडणुकांसाठी महत्त्वाचे संकेतही देणार आहे. मतदारांनी यावेळी पक्षांपेक्षा उमेदवाराच्या प्रामाणिकतेची आणि स्थानिक विकासाची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. 'युती कोणासोबत आणि विरोध कुणाचा' यापेक्षा 'शहराचा विकास, पारदर्शक निधी वापर, शहरी पायाभूत नियोजन आणि उत्तम प्रशासन कोण देऊ शकते' हे मतदारांनी विचारायला हवे. लोकशाहीचे खरे सामर्थ्य नागरिकांनी मतदान करून जबाबदार नेतृत्व उभे करण्यामध्ये आहे. यावेळी निवडणूक फक्त पक्षांची नसून मतदार जागृतीची असणे गरजेचे आहे. कारण अखेर शहराची नियती मतदारांच्या बोटांनीच बदलते!

# आरक्षण ५०% वर गेल्याने निवडणुका स्थगित होऊ शकतात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

राज्यात अनेक ठिकाणी ५० टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण गेले आहे. सुप्रीम कोर्टाने निर्देश दिले आहेत की ५० टक्क्यापेक्षा जास्त आरक्षण गेले तर आम्ही निवडणूक थांबवू शकतो, स्थगित करु शकतो, आणि रद्दही करु शकतो. कदाचित नगर-पंचायत, नगर-परिषदेच्या निवडणुका थांबू शकतात असे बबनराव तायवाडे यांनी म्हटले आहे.

बबनराव तायवाडे म्हणाले की, आदिवासी बहूल जिल्ह्यात एससी आणि एसटीचे आरक्षण मोठ्या प्रमाणात मिळते.मग ओबीसीसाठी काहीच शिल्लक राहत नाही. ओबीसींना २७ टक्के मिळाले नाही असे बऱ्याच ठिकाणी झाल्याचे तायवाडे यांनी म्हटले आहे.

ओबीसींचे मोठे नुकसान

नागपूर मनपा आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये आरक्षण ५० टक्क्यापेक्षा जास्त गेले आहे. एससी, एसटी आणि ओबीसी या ३ कॅटेगिरीला

## स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २७% ओबीसींना आरक्षण कायम द्या- बबनराव तायवाडे



आरक्षण देत असताना ज्या परिसरामध्ये ही निवडणूक आहे त्या परिसरात ज्या समाजाची लोकसंख्या जितकी आहे त्या प्रमाणात एससी आणि एसटीला आरक्षण द्यावे लागते. यानंतर ५० टक्क्यांमधून जे आरक्षण राहिल ते ओबीसींना मिळेल. यामुळे ओबीसींचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांना काही ठिकाणी शुन्य टक्के आरक्षण मिळाले आहे, असे ओबीसी नेते बबनराव तायवाडे यांनी म्हटले आहे.

आजच्या निकालाकडे आमचे लक्ष

बबनराव तायवाडे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेश दिले होते तेव्हा सांगितले होते की २०२२ पूर्वी जी पद्धत अस्तित्वात होती त्या पद्धतीचा वापर करत या निवडणुका घेण्यात याव्यात. तेव्हा आम्ही सर्व ओबीसी आनंदी झालो होतो की आपले २७ टक्के आरक्षण कायम राहिले आहे. पण आता नव्याने पुढे येत आहे की २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला होता त्यांचा चुकीचा अर्थ सरकारने काढला यात आरक्षण ५० टक्क्याच्या वर जात आहे. जे बांठिया कमिशनच्या ओपिनियनच्या विरोधात आहे असे म्हटलेले आहे. पण त्यांचे २०२२ नंतर आले होते तर न्यायालयाने २०२२ पूर्वीची पद्धत म्हटले होते. जेव्हा ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये २७ टक्के आरक्षण होते. आजच्या निकालाकडे आमचे लक्ष लागले आहे.

ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिले पाहिजे

बबनराव तायवाडे म्हणाले की, संविधानाच्या कलम २४३ डी ६ मध्ये जो पर्यंत अमेंडमेंट करत देशातील ओबीसींना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये २७ टक्के आरक्षणाची तरतूद करत नाही तो पर्यत हे जे प्रकरण न्यायालयात सुरू असते ते संपुष्टात येणार नाही. एथड मध्ये १० टक्के आरक्षण देताना संविधानामध्ये तरतूद करण्यात आली होती. ५० टक्क्यावर आरक्षण जाणार नाही असा नियम होता पण संसदेत हे बिल पारीत करत हे आरक्षण लागू करण्यात आले. ते सुप्रीम कोर्टात चॅलेंज झाले नाही त्याच प्रकारे ओबीसींना २७ टक्के आरक्षण दिले पाहिजे.




## डाळींबाचे सेवन विविध आजारांवर आहे गुणकारी

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

डाळिंबाची महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात लागवड होते. विविध पोषक घटकांचा स्रोत म्हणून डाळिंब ओळखले जाते. डाळिंबामध्ये विविध पोषक घटक, खनिजे मुबलक प्रमाणात असतात.




प्रामुख्याने यामध्ये फ्लेव्होनॉइड्स, अँथोसायनिन्स, प्युनिकिक सिड, एलाजिटानिन्स, अल्कलॉइड्स, फ्रुक्टोज, सुक्रोज, ग्लुकोज तसेच लोह, फॉस्फरस, कॅल्शिअम ही खनिजे मुबलक प्रमाणात असतात. डाळिंबामध्ये न्टिऑक्सिडंट गुणधर्म असतात.

यामुळे शरीरातील वाईट कोलेस्टेरॉल कमी होते, रक्तदाब नियंत्रणात राहतो. डाळिंबाच्या रसाच्या सेवनामुळे हृदयाचे कार्य सुधारते. हृदयरोगापासून बचाव होतो. तसेच कर्करोग पेशींच्या वाढीस प्रतिबंध करते.

डाळिंब सेवनाचे फायदे

१) डाळिंब थकवा दूर करणारे आहे.

२) अतिश्रम, प्रवास, तापानंतरचा येणारा थकवा यासाठी डाळिंबाचे दाणे किंवा रस फार उपयोगी पडतात. त्याने उत्साह वाढतो.

३) दाडीमादी घृत, दाडीमाष्टक चूर्ण अशी अनेक औषधे डाळिंबापासून तयार केली जातात, पण प्रत्येक व्याधीनुरूप त्याची मात्रा वेगळी असल्याने त्यानुरूप प्रमाण ठरवावे लागते. शिवाय काही औषधांत साखरेचे प्रमाणही असते.

४) शुगरचा त्रास असताना अशी औषधे विचारपूर्वक योजावी लागतात. म्हणून तज्ज्ञांच्या सल्ल्याशिवाय घेऊ नयेत.

५) डाळिंबाच्या फळाच्या सालीप्रमाणे त्याच्या मुळाची सालही औषधी असते. पोटातल्या जंतासाठी वावडिंगाबरोबर मुळाची साल पाण्यात उकळून प्यायल्यास चांगला फायदा होतो.

६) याचाच अर्थ सर्व पित्तप्रकृतीच्या, उष्णतेचा त्रास असणाऱ्यांसाठी डाळिंब हे वरदान आहे. कोणत्याही जातीचे डाळिंब असले तरी उपयुक्तच असते.

७) गर्भारपणामध्ये, सुतिकावस्थेतही डाळिंब आईसाठी आणि बाळासाठी उत्तम कार्य करते. शहाळे, लिंबू सरबत याला डाळिंबाचा रस हा उत्तम पर्याय आहे. फक्त ते गोड आणि व्यवस्थित पिकलेले रसदार असायला हवे.

८) महिलांना एकाच वेळी अनेक जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. शिवाय मुलांचे संगोपन, कुटुंबाची काळजी या महत्त्वाच्या गोष्टी असतातच. अशावेळी दमछाक होऊन आलेला शीण कमी करण्यासाठी डाळिंब जरूर खावे

# रब्बी मका पेरणी कधीपर्यंत आणि कशी करावी, जाणून घ्या सविस्तर

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक**

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

रब्बी हंगामातीलमकापेरणीसाठी नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत करणे आवश्यक असते. रब्बी हंगामातीलमका लागवड खरीप हंगामापेक्षा अधिक फायदेशीर असू शकते आणि त्यासाठी योग्य नियोजन, जसे की खत व्यवस्थापन आणि योग्य वाणांची निवड, करणे आवश्यक असते.

रब्बी मका पिकाची पेरणी पाण्याची उपलब्धता असल्यावरच रब्बी मका पिकाची पेरणी करावी.

रब्बी हंगामात मका पेरणी १५ नोव्हेंबर पर्यंत पूर्ण करावी.

पेरणीसाठी एकरी ६ ते ८ किलो बियाणे लागते.

पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास थायरम हे बुरशीनाशक २.५ ग्रॅम आणि सायन्ट्रानिलीप्रोल (१९.८%) + थायमिथोक्झाम (१९.८% एफएस) हे संयुक्त कीटकनाशक ६ मिली या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

रासायनिक बीजप्रकियेनंतर, अॅझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू संवर्धक प्रत्येकी २५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

रब्बी हंगामात सरी-वरंबा पद्धतीचा अवलंब करावा.



उशिरा व मध्यम कालावधीच्या जातींसाठी ७५, २० सें.मी. तर लवकर पक्व होणाऱ्या जातींसाठी ६०, २० सें. मी. अंतरावर सरीच्या बगलेत मध्यावर एका बाजूला टोकण पद्धतीने ४ ते ५ सें.मी. खोलीवर पेरणी करावी.

- ग्रामीण कृषी मौसम सेवा आणि विभागीय संशोधन केंद्र, इगतपुरी

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आज पार पडला. श्रीमती विमलाबाई देशमुख सभागृह, जिल्हा क्रीडा संकुल आणि श्री शिवाजी उद्यान विद्या महाविद्यालयात विविध कार्यक्रमांनी हा महोत्सव उत्साहात संपन्न झाला.

जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. श्री. शशिकांत देशमुख, माजी जिल्हा क्रीडा अधिकारी प्रदीप शेटीये, संजय कथलकर, माजी तालुका क्रीडा अधिकारी अशोक महल्ले, भारत मुंडे, शिशिर मेश्राम आदी उपस्थित होते.

जिल्हा युवा महोत्सवातील वक्तृत्व स्पर्धेत प्रथम - प्रतीक्षा शिंदे, द्वितीय - सौरभ गुडधे, तृतीय - कृष्णानेश यादव. काव्यलेखनमध्ये प्रथम - कोमल बोरीवार, द्वितीय - व्यंकटेश नेरकर , तृतीय - भूमिका काठे. चित्रकलेत प्रथम - खुशी उपरीकर, द्वितीय - मुकेश अढाऊ, तृतीय - अखिल डोंगरे, कथालेखनात प्रथम - व्यंकटेश नेरकर, द्वितीय - मानसी डोंगरे, तृतीय - रायबा ठाकरे, लोकगीतात प्रथम - श्री शिवाजी उद्यान विद्या महाविद्यालय, अमरावती, द्वितीय - एडीफाय इंग्लिश स्कुल, अमरावती, तृतीय - सुरसंगम कला वाद्य अकादमी प्रबोधिनी, अमरावती, लोकनृत्यात प्रथम - ऐडीफाय इंग्लिश स्कूल, अमरावती, नवोपक्रम ट्रॅक




(विज्ञान प्रदर्शन): प्रथम - ऐश्वर्या तारवानी , द्वितीय - अवेस खाँ युनुस खाँ, तृतीय - सुमित जाखड, रेहॉन खान हे विभागस्तरीय स्पर्धेत सहभागी होणार आहेत. क्रमांक पटकाविलेल्यांना उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. यावेळी श्री. भटकर यांनी, सांस्कृतिक कार्यक्रम हे परंपरा, संस्कृती, सामाजिक जीवनमूल्ये यांचे आदानप्रदान करण्यास सहाय्यक आहेत. युवकांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव देणे आणि राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागण्याचे हे व्यासपीठ असल्याचे सांगितले. श्री. जाधव यांनी प्रास्ताविकातून युवा महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना आपली कला प्रदर्शित करण्याची संधी मिळते.

त्यांनी राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्यासाठी 'विकसित भारत चॅलेंज ट्रॅक' करिता माय भारत पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन केले. तालुका क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी सूत्रसंचालन केले. शिशिर मेश्राम यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. संजय कथलकर यांनी आभार मानले.

# महानुभावीय सांकेतिक 'सकल लिपी' विषयावर मंथन

## रिद्धपर येथे आजपासून दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन, देश-विदेशातील प्रतिनिधी होणार सहभागी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०रिद्धपुर-** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी मराठी भाषा व तत्वज्ञान अध्ययन केंद्र, रिद्धपूरतर्फे २० व २१ नोव्हेंबर रोजी महानुभावीय सांकेतिक 'सकल लिपी' अध्ययन विषयावर आंतरराष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. आर कार्यशाळेचे उद्घाटन विश्वविद्याल याच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा करतील. उद्घाटन समारंभात मराठी भाषा विद्यापीठ रिद्धपूरचे कुलगुरू प्रो. अविनाश आवलगावकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्षक विश्वर कुलाचार्य प.पू.प.म. श्री कारंजेकर बाबा हे समारंभाचे विशिष्ट अतिथी म्हणून उपस्थित राहतील. विश्वविद्यालयाचे निवासी लेखक डॉ. भूषण भावे विशेष अतिथी राहतील, तर कार्यकारी कुलसचिव कादर नवाज़ खान आणिदर्शन व संस्कृती विभागाचे असोशिएट प्रोफेसर डॉ. जयंत उपाध्याययांची विशेष उपस्थिति राहील. उद्घाटन सत्राचे संचालन अनुवादक डॉ. स्वप्निल मून करतील तर डॉ. नितीन रामटेके आभार मानतील. कार्यशाळेत देश-विदेशातील शंभरहून अधिक प्रतिनिधी भाग घेणार आहेत. २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रथम सत्र सकल लिपीची ऐतिहासिक पार्श्वभूमी या विषयावर होईल. या सत्रासाठी विशेष तज्ज्ञ म्हणून श्री चक्रधर कोठी उपस्थित राहतील. द्वितीय सत्रात महानुभावीय सकल लिपीच्या वर्णमालेच्या अध्ययनावर विशाल




हिवरखेडकर मार्गदर्शन करतील. २१ नोव्हेंबर रोजी तृतीय सत्र सकल लिपीतील शब्दलेखन आणि पठन या विषयावर असेल. या सत्राचे विशेष तज्ज्ञम्हणून श्री चक्रधर कोठी उपस्थित राहतील. चतुर्थ सत्र सकल लिपीतील सांकेतिक चिन्हांचे अध्ययन आणि पठन या विषयावर असेल व या सत्रात श्री विशाल हिवरखेडकर मार्गदर्शन करतील. कार्यशाळेचा समारोप सत्र २१ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता होईल. या सत्राचे अध्यक्षस्थान अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे माजी अध्यक्ष आचार्य प्रवर महंत श्री नागराज बाबा उर्फ महंत श्री गोपिराज बाबा भूषवतील. प्रमुख अतिथी म्हणून रिद्धपूर केंद्राच्या प्रभारी डॉ. नीता मेश्राम तर शोध अनुषंगी श्री चक्रधर कोठी आणि श्री विशाल हिवरखेडकर उपस्थित राहतील. कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन रिद्धपूर केंद्राच्या प्रभारी व कार्यशाळेच्या संयोजिका डॉ. नीता मेश्राम यांनी केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २० नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# महापालिका निवडणुकीत मतचोरीची शक्यता, काँग्रेस पदाधिकाऱ्यांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती :** आगामी अमरावती महापालिका निवडणूकीत मतचोरीची दाट शक्यता असून प्रशासनाने प्रत्यक्षात दर्शवलेली लोकसंख्या आणि गुरुवारी जाहीर होणारी मतदारांची संख्या यात मोठी तफावत असल्याने घोळ दिसून येत असल्याचा आरोप काँग्रेसचे माजी नगरसेवक मुन्ना राठोड व पदाधिकारी समीर जवंजाळ यांनी केला आहे.

उद्या २० नोव्हेंबरला मतदार यादी जाहीर होणार आहे. परंतु त्यापूर्वीच मतदार यादी आमच्या हाती लागली असल्याचा दावा मुन्ना राठोड आणि समीर जवंजाळ यांनी पत्रकार परिषदेत केला. काही प्रभागात दोन ते तीन हजार मतदारांची संख्या कमी करण्यात आली आहे. काही प्रभागात संख्या फुगविण्यात आली असल्याचा आरोप त्यांनी केला.



गेल्या ९ वर्षांपासून महापालिकेवर भाजपचे नियंत्रण आहे. परंतु याच काळात भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस आली आहेत. मालमत्ता करात १० टक्के वाढ करण्यात आली. शहरात अस्वच्छता व घाणीच साम्राज्य आहे. अशावेळी मतदार यादीत कुठे मतदारात वाढ तर कुठे घट करण्यात आली आहे. अमरावती शहरातील २२ प्रभागात मतदारांमध्ये ही वाढ व घट करण्यात आली आहे. अधिकृत मतदार यादी जाहीर करण्यासाठी महापालिकेने तीन वेळा तारखांमध्ये बदल केला आहे. भाजप मतचोरी करून महापालिका निवडणूक जिंकण्यासाठी प्रयत्नशील असल्याचा आरोप पत्रपरिषदेत करण्यात आला.

महापालिकेत भाजपचे ५० ते ५५ नगरसेवक निवडून येणार असल्याचा दावा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांच्या संपर्क दौऱ्यांच्या वेळी केला होता. त्यामुळे सत्ता भाजपचीच राहणार असल्याचे ते म्हणत आहेत. लोकसंख्या कमी व मतदार वाढविले जात असल्याने पालकमंत्री व भाजपचे नेते विजयाचे स्पष्ट संकेत देत असल्याचे मुन्ना राठोड म्हणाले.

शेगांव-रहाटगांव प्रभागात २७ हजार ४५७ लोकसंख्या असून दुरुस्ती मतदार ३३ हजार ७६७ आहेत. संत गाडगेबाबा-पीडीएमसी प्रभागात लोकसंख्या २६ हजार ९५२ तर दुरुस्ती मतदार २५ हजार ४३८ आहेत. नवसारीमध्ये ३० हजार ७० लोकसंख्या तर दुरूस्ती मतदार ३६ हजार ९२९ आहेत.सूतगिरणी -सामरा नगरमध्ये ३१ हजार १८४ लोकसंख्या असतांना मतदार ४० हजार ११३ आहेत. जुनी वस्ती बडनेरामध्ये लोकसंख्या ३२ हजार १५ असतांना मतदार घटले असून ही संख्या ३१ हजार ६४४ झाली आहे. यामुळे मतदार यादीत घोळ करून महापालिका काबीज करण्याचा प्रयत्न असल्याचा थेट आरोप मुन्ना राठोड यांनी केला आणि मतदारांची आकडेवारीच पत्रकार परिषदेत जाहीर केली.

# १० नगर परीषद, २ नगर पंचायत निवडणूक प्रक्रिया

# पहिल्या दिवशी ७ उमेदवारांची निवडणूक रिंगणातून माघार

## नगराध्यक्षपद २ तर सदस्यांमधून ७ उमेदवारांनी मैदान साडले२१ नोव्हेंबरपर्यंत नामांकन मागे घेण्याची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२० अमरावती** जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगाव सुर्जी, वरुड, दर्यापूर, चांदूरबाजार चिखलदरा सुरु धामणगाव रेल्वे, मोशी, चांदूर रेल्वे आणि शेंदूरजना घाट या दहा नगर परिषद आणि धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगर पंचायतीची निवडणूक रणधुमाळी आता झाली आहे. नामांकन दाखल आणि नामांकन छाननी प्रक्रिया आटोपल्यानंतर आता १९ ते २१ नोव्हेंबरपर्यंत नामांकन मागे घेण्याची मुदत आहे. यानुसार नामांकन परत घेण्याच्या पहिल्यादिवशी बुधवार १९ नोव्हेंबरलाएकूण ७ उमेदवारांनी आपले नामांकन परत घेतले. यात नगराध्यक्षपदाचे २ तर सदस्य पदासाठी ५ जणांनी निवडणूक मैदान सोडण्याचा निर्णय घेतला. नामांकन मागे घेण्याकरिता आणखी दोन दिवस शिल्लक असल्याने दोन दिवसांत किती उमेदवार निवडणुकीचे मैदान सोडतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.




### नगराध्यक्ष १०८, सदस्यपदासाठी १५१६ वैध

जिल्ह्यात १० नगरपरिषद, २ नगर - पंचायतमध्ये सार्वत्रिक निवडणुकीकरिता १२ अध्यक्षपदासाठी १२७ नामांकन प्राप्त झाले होते. छानणी दरम्यान यातील १९ अर्ज अवैध ठरल्याने नगराध्यक्षपदासाठी १०८ उमेदवारी अर्ज शिल्लक राहीले होते. तसेच सदस्यपदाकरिता १८२१ नामांकन प्राप्त झाले असतांना यातील २९५ नामांकन अवेध ठरल्याने सदस्यांकरीता १५१६ नामांकन शिल्लक होते.

### ७ जणांची माघार

अचलपूर नगर परिषदेत नगराध्यक्ष पदाच्या २ तर सदस्य पदाच्या एकाने आपले नामांकन परत घेत निवडणूक लढण्याचा विचार बदलविला. तर दर्यापूर नगर परिषदेत सदस्यपदाच्या एकाने नामांकन परत घेतले. तसेच मोर्शी नगर पंचायतीमध्ये सदस्यपदा साठीचे ३ नामांकन मागे घेण्यात आले आहे.

### ... तर २५ नोव्हेंबरपर्यंत संधी

त्यामुळे या उमेदवारांना अपील नसेल तेथे १९ ते २१ नोव्हेंबर दरम्यान अर्ज मागे घेण्याची संधी देण्यात आली आहे. परंतु जेथे अवैध नामांकनाबाबत अपील दाखल आहेत तेथे २५ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार आहे. बुधवारी नामांकन रद्द करणाऱ्यांमधून एकही अपील दाखल करण्यात आली नव्हती.

### आणखी दोन दिवस शिल्लक

तर नामांकन मागे घेण्याच्या पहिल्या दिवशी अध्यक्षांचे दोन व सदस्यांमधुन पाच उमेदवारांनी अर्ज मागे घेतले आहे. त्यामुळे सद्यास्थितीत अध्यक्षपदाकरिता १०६ तर सदस्यपदाकरिता १५११ उमेदवार रिंगणात आहेत. या दोन दिवसांत यामधुन किती उमेदवार निवडणूक मैदान सोडतात याकडे लक्ष लागले आहे.

# शाळांच्या सहलीसाठी मिळणार 'एसटी' च्या नव्या बसेस

## रोज ८०० ते १००० बसेस असणार उपलब्ध

### राज्यभरातील २५१ आगारांमधून व्यवस्था


**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती** -स्वस्त आणि सुरक्षित ' प्रवासाचा आनंद घेण्यासाठी यंदा शाळा - महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळ नवीन बसेस उपलब्ध करून देणार आहे, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री - प्रताप सरनाईक यांनी दिली. दरवर्षीप्रमाणे दिवाळी सुट्टी संपली की, शाळेच्या विद्यार्थ्यांना विविध प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी सहलीचे वेध लागतात. शालेय सहली हा विद्यार्थी जीवनातील अतिशय संस्मरणीय असा अनुभव असतो. राज्य शासनाच्या एसटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय सहलीसाठी त्यांच्या एकूण भाड्यामध्ये ५० % सवलत देते.



त्यामुळे अतिशय माफक दरात विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध धार्मिक, ऐतिहासिक, पर्यटन स्थळांना भेट देणे शक्य होते. तो त्यांच्या शालेय अभ्यासक्रमातील एक उपक्रम असतो. यंदा एसटीकडे असलेल्या नवीन बसेस या शालेय सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. राज्यभरात असलेल्या एसटीच्या २५१ आगारांमधून दररोज ८०० ते १००० बसेस विविध शाळा व महाविद्यालयांना सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जातील, अशी माहिती मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.विदर्भातील सर्वच आगरामध्ये ही व्यवस्था उपलब्ध आहे. मागील वर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारी दरम्यान राज्यभरातील विविध शाळा - महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळाने तब्बल १९६२४ बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. या माध्यमातून एसटीला तब्बल ९२ कोटी रुपयांचा प्रतिपूर्ती रक्कमेसह महसूल प्राप्त झाला होता. यंदा देखील प्रत्येक आगारातून त्यांच्या कार्य क्षेत्रातील शाळा - महाविद्यालयांना दररोज एसटी बसेस उपलब्ध करून देण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे. अमरावती आगारप्रमुख, स्थानकप्रमुख स्वतः शाळा - महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना भेटून विविध धार्मिक ऐतिहासिक पर्यटन स्थलांच्या सहलीचे आयोजन करण्यासाठी आवाहन करीत आहे.

# कंपोस्ट डेपो बायोमायनिंग १३ कोटींच्या निविदेसाठी तीन कंपन्यांची उत्सुकता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती-** सुकळी कंपोस्ट डेपोमधून होत असलेल्या प्रदूषणामुळे मनपावर बसलेल्या ४७ कोटी रुपयांच्या दंडाच्या न पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने बायोमायनिंगचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्देशांनुसार अमरावती महानगर पालिकेने सुमारे १३ कोटी रुपयांची नवीन बायोमायनिंग निविदा काढली आहे. मंगळवारी मनपा बांधकाम विभागात झालेल्या प्री-बिड मीटिंगमध्ये तीन कंपन्यांनी सहभाग नोंदवला. यामध्ये सध्याची कंत्राटदार कंपनी गंगा ट्रेडिंग कंपनी, पुणे येथील आर. के. दाते कंपनी, तसेच अमरावतीची कोअर प्रोजेक्ट यांचा



त्यात समावेश होता. बायोमायनिंगसाठी ई-निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख २८ सप्टेंबर निश्चित करण्यात आली आहे. एल-१ पद्धतीनुसार सर्वात कमी दर देणाऱ्या कंपनीला काम देण्यात येईल.

जुना व नवीन कचरा दोन्हीवर होणार बायोमायनिंग सुकळी कंपोस्ट डेपोमध्ये मोठ्या प्रमाणावर जुना कचरा साचलेला असून त्यावर बायोमायनिंग करणे बाकी आहे. याशिवाय एसएलएफ (डरपळींरी डरपव ऋठश्रश्रळपस) साठी खणलेल्या गटारातून बाहेर पडणाऱ्या कचऱ्यावरही प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

शहरातून दररोज जमा होणारा कचरा देखील बायोमायनिंगद्वारे प्रक्रिया केला जाणार आहे. दररोज होणाऱ्या डंपमुळे कचऱ्याचा साठा वाढत असल्याने मनपाने नवीन निविदा काढण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते.

### सुप्रीम कोर्टाकडून माहिती सादर करण्याचे आदेश

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात सुनावणीदरम्यान मनपाने जुन्या व नव्या कचऱ्याबाबत वेगवेगळी आकडेवारी सादर केल्याने न्यायालयाने नाराजी व्यक्त केली होती. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ताज्या निर्देशात मनपाला आदेश दिले आहेत की, पुढील तीन महिन्यांनंतर होणाऱ्या सुनावणीत बायोमायनिंगसाठी किती कचरा शिल्लक आहे आणि काम पूर्ण करण्यास किती कालावधी लागणार आहे, याची नेमकी व ठोस माहिती सादर करावी. ४७कोटींच्या दंडापासून बचाव करण्यासाठी मनपाने बायोमायनिंग प्रक्रिया गतीमान करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत.

# भाईगिरीचा बळी; युवकाची हत्या, मारेकरी फरार

## संविधान चौकात घडली घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती** - एका दुचाकीवरून आलेल्या तीन ते चार युवकांनी एका युवकावर चाकूने सपासप वार करून गंभीर जखमी केले. गंभीर अवस्थेत त्याला जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

भाईगिरीतून ही हत्या झाल्याचे समजते. स्थानिक संविधान चौकात बुधवारी सायंकाळी ही घटना घडली. या घटनेमुळे परिसरात चांगलीचखळबळ उडाली.



यश रवींद्र पाटणकर (वय २५, रा. विलासनगर) असे मृताचे नाव आहे. तर निखरे, खरे, बोबडे, यादव आणि मिरची अशी मारेकऱ्यांची नावे समोर आली असून पोलीस त्यांच्या शोधात आहेत. बुधवारी सायंकाळी यश हा त्याच्या घरासमोरील गिट्टी बाजूला करीत होता. तेव्हा बुलटेवरतीन ते चार युवक आले आणि यशवर चाकूने सपासप वार करून लक्ष्मीनगरच्या दिशेने पसार झाले.

घटनेनंतर शेजाऱ्यांनी तत्काळ यशलाजिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.यशचा खून झाल्याची माहिती परिसरात पसरताच यशचे नातेवाईक व त्याच्या मित्रांनी रुग्णालयात धाव घेतली. गाडगेनगर पोलिसांचा ताफा घटनास्थळी दाखल झाला होता. पोलिसांनी याघटनेत हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला.

# महानगर पालिका निवडणूक प्रक्रिया आज प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध होणार

## मनपा मुख्यालय व पाच झोन कार्यालयात झळकणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती,** राज्यातील २९ महानगर पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा सुधारीत कार्यक्रम-२०२५ राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केला आहे. त्यामुळे आता अमरावती महापालिकेच्या निवडणुकीसाठी आता प्रारुप मतदार यादी २० नोव्हेबर २०२५ रोजी प्रसिद्ध होणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन महानगर पालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार केलेली प्रारुप मतदार यादी, हरकती व सूचना मागविण्याकरिता २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. त्यानंतर प्रारूप मतदार यादीवर हरकती व सूचना




दाखल करण्यासाठी २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत मुदत दिली आहे. प्रारुप मतदार यादीवर दाखल हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय अंतिम मतदार याद्या अधिप्रमाणित करुन ५ डिसेंबर २०१५ रोजी प्रसिद्ध होईल. त्यानंतर मतदान केंद्रांच्याठिकाणांची यादी ८ डिसेंबर व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी १२ डिसेंबर २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने मनपा आयुक्तांना निर्देशित केले आहे.

# मूल्यांकनात 'संगाबा' विद्यापीठ तृतीय

# कुलगुरुंच्या हस्ते आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांचा सत्कार

**,विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती-** राज्याच्या उच्च व तंत्र व शिक्षण विभागाने सेवाशर्ती कार्यक्रमांतर्गत शासकीय अकृषी विद्यापीठांमध्ये राबवलेल्या मूल्यांकनात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला ६३ गुणांसह तृतीय स्थान मिळाले आहे. या यशाबद्दल विद्यापीठाच्या आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सत्कार केला. कमी मनुष्यबळातही आपल्याला हे यश प्राप्त करता आले, हे अतिशय अभिमानास्पद असून, केलेल्या मूल्यांकनात आपले विद्यापीठ राज्यात तृतीय स्थान प्राप्त करु शकले, ते आस्थापना विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्यामुळेच शक्य झाले आहे,' असे गौरवोद्गार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी याप्रसंगी व्यक्त केले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

या मूल्यांकनात गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली विद्यापीठाने ६८ गुणांकनासह प्रथम स्थान, तर मुंबई विद्यापीठ व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी ६६ गुणांसह द्वितीय स्थान पटकावले आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागाने राज्यातील १३ सार्वजनिक अकृषी विद्यापीठांच्या कामकाजाची तपासणी केली. या उपक्रमात विभागाने विविध निकषांच्या



आधारे विद्यापीठांच्या कामगिरीचे मूल्यांकन केले. या उपक्रमासाठी विद्यापीठाकडून कोणतेही अर्ज किंवा माहिती मागवले नाही. सरकारकडे सादर केलेल्या माहितीच्या आधारे २०२४- २५ या शैक्षणिक सत्रातील कामकाजाचे अन्र्स्ट ॲन्ड यंग कंपनीची मदत घेवून सदर मूल्यमापन केले गेले.

कामकाजाचा आकृतीबंध, सेवा प्रवेश नियम, सर्व संवर्गाची अद्ययावत ज्येष्ठता सूची, पदोन्नतीने नियुक्ती, सरळसेवा नियुक्ती, रिक्त पद स्थिती, बिंदू नामावली प्रमाणीकरण, अनुकंपा नियुक्ती, आय.जी.ओ.टी. पोर्टलवर नोंदणी आणि पाच अभ्यासक्रम पूर्ण करणे तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत व डिजिटल करणे असे निकष मूल्यांकनासाठी निश्चित करण्यात आले होते. या सर्व निकषांचे मिळून शंभर गुण ठेवण्यात आले होते. या यशाबद्दल कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, आस्थापना विभागाचे उपकुलसचिव मंगेश वरखेडे, सहा. कुलसचिव अनिल मेश्राम, अधीक्षक अमोल म्हैसाळकर, वरिष्ठ सहाय्यक अजय देशमुख, डॉ. श्रीकांत तायडे, जगदीश देशपांडे, नरेंद्र खैरे, प्रदीप चिमोटे, प्रशांत देशमुख, आदिती मोहोड, अनंत पाटील, आशीष माहोरे, राम पासरे, संदीप ताथोडे, साहील क्षीरसागर, चंद्रकांत धंदर, दिनेश मारोडकर, रामेश्वर सोळंके, बिहारीलाल जयस्वाल, वंदना गुरनुले आदी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले,-

# बिबट्याच्या हालचालीने वाठोडा खुर्द व परिसरात खळबळ

## वनविभागाची तात्काळ पाहणी, नागरिकांना दिलासा



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० अमरावती–** वाठोडा खुर्द, बनसापुर व भांबोरा या तीनही गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून बिबट दिसल्याच्या घटनांमुळे ग्रामीण भागात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. याबाबत स्थानिक शेतकर्यांनी वनविभागाकडे निवेदन सादर करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली होती. शेतकरी आणि ग्रामस्थांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत तिवसा वर्तुळातील वनविभागाचे संपूर्ण पथक घटनास्थळी दाखल झाले.

वनविभागाचे अधिकारी जि. डी. जांभे यांनी वनरक्षक एम. डी. गवई व एम. एन. डायरे यांच्यासह संबंधित परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. सरपंच, पोलिस पाटील, स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी आणि महिलांशी संवाद साधून परिस्थितीचे सखोल आढावा घेण्यात आला. पाहणीदरम्यान नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण दिसून येत असले तरी वनविभागाने लगेचच जनजागृती करत नागरिकांना शांत राहण्याचे आवाहन केले.

**नागरिकांना मार्गदर्शन**

पथकाने बिबट दिसलेल्या ठिकाणी नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याच्या सूचना देत खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले. संध्याकाळी व पहाटेच्या वेळात एकटे बाहेर जाणे टाळावे, विशेषतः मुलांना घराबाहेर एकटे सोडू नये.

घराच्या आवारात व शेताच्या कडेला असलेली झुडपे, उंच गवत, अनावश्यक कचरा यांची साफसफाई करावी, जेणेकरून बिबट वावरासाठी आडोसा तयार होणार नाही. जनावरांना घराजवळ व सुरक्षित ठिकाणी मजबूत बांधून ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. परिसरातील अंधारे कोपरे, गोठे, अंगण रात्री प्रकाशमान ठेवावेत, जेणेकरून वन्यजीवांची हालचाल सहज ओळखता येईल. कुणाला बिबट दिसल्यास स्वतः कोणतीही धोकादायक कृती न करता तात्काळ वनविभागाशी संपर्क साधावा तसेच १९२६ या राज्यस्तरीय आपत्कालीन हेल्पलाईनवर कॉल करावा, असे आवाहनही करण्यात आले.अफवा पसरवू नयेत, फोटो–व्हिडीओसाठी गर्दी करू नये आणि परिसरात समन्वयाने व जबाबदारीने वर्तन करावे यावरही भर देण्यात आला. निरीक्षणानंतर वनविभागाच्या अधिकार्यांनी सांगितले की, सद्यस्थितीत परिसर पूर्णपणे नियंत्रणात आहे. नागरिकांना सर्व आवश्यक सूचना देण्यात आल्या असून वनविभाग पुढील काही दिवस नियमित गस्त, रात्रीचे निरीक्षण आणि हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवणार आहे.

# शिवसेना उबाठा आमदाराच्या पुतण्याची बंडखोरी

## शेकडो कार्यकर्ते युवा स्वाभिमान पार्टीत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अंजनगाव सुर्जी** युवा स्वाभिमान पार्टीच्या शक्तीवर्धनाला आणखी जोर मिळाला असून अंजनगाव सुर्जीव चांदुर बाजार परिसरातील उद्धव ठाकरे गटातील महत्त्वाचे कार्यकर्ते आणि शेकडो समर्थकांनी युवा स्वाभिमान पार्टीत मध्ये जाहीर प्रवेश केला. वायएसपीचे मार्गदर्शक सुनिल राणा यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा स्वाभिमान पार्टीच्या राजापेठ येथील मुख्य कार्यालयात हा भव्य प्रवेश सोहळा पार १. या मोठ्या प्रवेशामुळे अंजनगावसुर्जी व चांदुर बाजार येथील उद्धव ठाकरे गटाला मोठा धक्का बसल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. अंजनगाव सुर्जी उ.बा. ठा. गटाच्या माजी शहराध्यक्षा रजनी प्रशांत पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह वायएसपी मध्ये प्रवेश केला. त्याचबरोबर आ. गजानन लवटे यांचे पुतणे चंद्रकांत उर्फ बंटी लवटे यांनीही जाहीर प्रवेश केला. प्रवेशानंतर मार्गदर्शक सुनिल राणा व राष्ट्रीय कार्यकारणीद्वारे बंटी लवटे यांना उमेदवारी जाहीर करून मानाचा बहुमान दिला. राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टी कार्यकारिणीच्या प्रमुख

उपस्थितीत मार्गदर्शक सुनिल राणा यांनी सर्व नवीन उमेद्वार, कार्यकर्ते व समर्थकांचे स्वागत केले. प्रवेशाप्रसंगी निळकंठ कात्रे, जयंतराव वानखडे, शैलेंद्र कस्तुरे, प्रा. अजय गाडे, हरिश चरपे, गंगाधर आवारे, अजय देशमुख, आशिष कावरे, अजय घुले, संजय हिगासपुरे, मंगेश कोकाटे, पवन हिगणे, निलेश देशमुख, जिवन चर्‍हाटे, सुवर्णा चरहाटे,



संजय नाठे, मयुर श्रीवास्तव, गौरव व्यवहारे, देवेंद्र व्यवहारे, अवि नानवंशी, अजयनानवंशी, लतिका लाडोळे, भावना नांदरेकर, सागर दायमा, डॉ. राहुल अहिर, सुबोध वासनकर, संकेतराऊत, धनुशतायडे, प्रतिभायादव, कांचननांदरेकर, सिमातायडे, सुधिर तायडे, विवेक चर्जन, पद्मादुबे, राहुल बलिगे, दिप बोरवार, दिगांबर गायकवाड, विजय राऊत, यश मनगठे, शितल बुरघाटे, कल्पना वर्मा, गोपाल लाडोळे, प्रशांत पाटील, वामनराव भावे, संगिता सिनकर, विलास दुबे, राजु अस्वार, रेखा सोनटक्के, ईश्वर पाटील, मोहन अतकर, सतिश साहु, निशालवटे, साहिल गौर, ओम भट, आदित्य गवई, प्रकाश गवई, प्रेमलाल रॉय, अक्षय ताटेकर, हितेश इंगळे आदी उपस्थित होते.

## अंजनगाव नगर परिषद निवडणूक:

# निरीक्षक प्रमोद एन्डोले यांनी घेतला आढावा

### तयारी, मतदान केंद्रे आणि सुरक्षा व्यवस्थेची केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अंजनगाव सुर्जी**

अंजनगाव सुर्जी नगर परिषदेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी विभागीय आयुक्तांनी नियुक्त केलेले निवडणूक निरीक्षक प्रमोद एन्डोले यांनी निवडणूक प्रक्रियेचा सखोल आढावा घेतला. या दौर्‍यादरम्यान त्यांनी नगर परिषदेतील विविध विभागांच्या कामांची पाहणी केली. निरीक्षक एन्डोले यांनी सर्वप्रथम नगर परिषद कार्यालयास भेट दिली. तेथे त्यांनी जिल्हा प्रशासनाने नियुक्त केलेले निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी



(एसडीओ) राजेश्वर हांडे यांची भेट घेतली. निवडणुकीच्या तयारी, कागदपत्रांची पूर्तता आणि उमेदवारांच्या संख्येबाबत तपशीलवार माहिती घेऊन त्यांनी संबंधित अधिकार्‍यांना आवश्यक सूचना दिल्या. यानंतर एन्डोले यांनी शहरातील विविध मतदान केंद्रांची पाहणी केली. त्यांनी वीज पुरवठा, स्वच्छता व्यवस्था, पायाभूत सुविधा आणि सुरक्षा उपाययोजनांची तपासणी केली. मतदान केंद्रे सुस्थितीत ठेवण्याबाबत संबंधित अधिकार्‍यांना सूचनाही देण्यात आल्या. त्यांनी अर्ज छाननीच्या कामाची प्रगतीही प्रत्यक्ष पाहिली आणि स्थिरता पथकाला भेट देऊन त्यांच्या कामकाजाबाबत मार्गदर्शन केले. मतदान जागृती मोहिमेची तपासणी करून सहभाग वाढवण्यासाठी अधिक प्रभावी उपक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या. नागरिकांना निवडणुकीसंदर्भात काही तक्रारी किंवा सूचना असल्यास, त्यांनी थेट निवडणूक निरीक्षक प्रमोद एन्डोले यांच्या ८५५१०१९१८२ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही निरीक्षकांनी केले आहे.

# चांदूर रेल्वेत नगराध्यक्षपदासाठी काँग्रेससमोर काँग्रेसचेच आव्हान

## चांदूर रेल्वेत निवडणुकीची राजकीय रणधुमाळी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० चांदुर रेल्वे** काँग्रेस पक्षात असतानाच सहकार क्षेत्रात कार्यरत हर्षल वाघ काँग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. या वेळी त्यांनी त्यांच्या पत्नी पूजा हर्षल वाघ यांच्यासाठी नगराध्यक्षपदाची उमेदवारी मागितली होती, परंतु पक्षाने उमेदवारी दिली नाही. त्यामुळे त्यांनी बंडखोरी करत पत्नी पूजा हर्षल वाघ यांची अपक्ष उमेदवारी दाखल केली. त्यांच्या या कृतीमुळे काँग्रेससमोर तूर्त काँग्रेससचेच आव्हान उभे ठाकले आहे.

दरम्यान स्वतः हर्षल वाघ यांनीही प्रभाग क्रमांक चार मधून




नगरसेवक पदासाठी उभे आहे. चांदूर रेल्वे नगरपालिकेत एकूण २० नगरसेवक आणि एक नगराध्यक्ष निवडायचा आहे. दहा प्रभागांसाठी ही निवडणूक होत असून, नगराध्यक्ष पदासाठी सहा तर नगरसेवक पदासाठी ९९ उमेदवार मैदानात उतरले आहेत. येथील नगराध्यक्षपद महिलांसाठी राखीव आहे.

**हे आहेत अध्यक्ष पदाचे उमेदवार**

- भाजप– स्वाती मेटे
- काँग्रेस – पूनम सूर्यवंशी
- वंचित– प्रियंका विश्वकर्मा
- आम आदमी पक्ष – नम्रता गवळी
- अपक्ष – पूजा वाघ
- शिवसेना (उबाठा) – भावना यादव

त्यामुळे काँग्रेस, भाजप, वंचित बहुजन आघाडी, शिवसेना (उबाठा) आम आदमी पार्टीने उमेदवार उभे केले असून, अपक्ष पूजा हर्षल वाघ यांनी आव्हान उभे केले आहे. दरम्यान नगरसेवक पदासाठी कोणत्याही पक्षात बंडखोरी झाली नाही, मात्र मागील तीन दिवसापासून काही पक्षातील अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश घेतला आहे. सद्यःस्थितीवरुन असे लक्षात येते की चांदूर रेल्वे नगरपरिषदेत अध्यक्षपदाच्या निवडणुकीमध्ये चुरशीची लढत होणार आहे.

## मनपाच्या प्रभागनिहाय आरक्षणावर

# तिसऱ्या दिवशी प्रभाग ४ व २२ मध्ये दोन आक्षेप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अमरावती** अमरावती महानगरपालिकेने बुधवारी १२ नोव्हेंबर २०१५ रोजी २२ प्रभागाचे आरक्षण जाहीर केले होते. त्यानंतर १७ ते २४ नोव्हेंबरदरम्यान यावर आक्षेप–हरकती घेण्याची मुदत आहे. यानुसार पहिल्या व दुसऱ्या दिवशी कोणताच आक्षेप दाखल झाला नाही. मात्र तिसऱ्या दिवशी १९६ नोव्हेंबरला प्रभाग ४ – जमीलकॉलनीलालखडी आणि प्रभाग क्रमांक २२ नवी वस्तीबडनेरा येथे दोन आक्षेप घेण्यात आले आहे.प्रभाग क्रमांक चार जमील कॉलनी लालखडी येथील अजागा ओबीसी, ब आणिक जागा सर्वसाधारण महिला आणि ड जागा सर्वसाधारण असे आरक्षण सोडतीत निघाले होते. मात्र इक्बाल साहिल यांनी या प्रभागामध्ये एक जागा ओबीसी ऐवजी दोन जागा ओबीसी आणि दोन सर्वसाधारण असे आरक्षण असायला पाहिजे होते.दुसरा आक्षेप



प्रभाग क्रमांक २२ नवी वस्ती बडनेरा या प्रभागांमधील आरक्षणावर घेण्यात आला. या प्रभागात अ– एससी महिला, ब– ओबीसी, क– सर्वसाधारण महिला आणि ड–सर्वसाधारण असे आरक्षण जाहीर झाले होते. यामध्ये अ जागेसाठी जे एसी महिला आरक्षण आहे, ते एसी पुरुष असे आरक्षण असायला पाहिजे असा आक्षेप प्रकाश पहूरकर यांनी यांनी घेतला आहे.

# ‘टी–९’ रोटेशन बंधनकारक; एसटीत गैरव्यवस्थापनाला ब्रेक

## चालक–वाहकांचे ड्युटी वाटप आता समान आणि पारदर्शक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०अमरावती** राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) चालक–वाहकांसाठी ड्युटी वाटपाची ‘टी–९’ रोटेशन पद्धत आता सर्व आगारांमध्ये बंधनकारक केली आहे. या निर्णयामुळे कामाचे समान वितरण, पारदर्शकता आणि गैरव्यवस्थापनाला आळा बसेल, असा विश्वास महामंडळ अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.मागील काही महिन्यांपासून विविध आगारांमध्ये काम वाटपात गैरप्रकार, पक्षपात आणि अनियमितता झाल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. काही चालक–वाहकांना ठराविक फेऱ्या, विश्रांती वेळा आणि सोयीच्या मार्गांवर प्राधान्य दिले जात असल्याचेही निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाच्या व्यवस्थापनाने सर्व आगारांसाठी ’टी–९’ रोटेशन पद्धत सक्तीची केली आहे. ’टी–९’ प्रणालीमार्फत प्रत्येक कर्मचाऱ्याची कामगिरी, उपस्थिती व अनुभव यांचा विचार करून स्वयंचलित नियोजन केले जाईल. आधी काही आगारांमध्ये ही पद्धत प्रायोगिक तत्त्वावर राबवण्यात आली होती



आणि त्याचे सकारात्मक परिणाम दिसून आले. आता संपूर्ण राज्यात ही रचना लागू केल्याने एसटीच्या कामकाजात शिस्त आणि पारदर्शकता येण्यास मदत होईल. या निर्णयाचे कर्मचारी संघटनांनी स्वागत केले असून ’योग्य वापर केल्यास ही प्रणाली कर्मचारी आणि प्रवासी दोघांच्याही हिताची ठरेल,’ अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे.

**संघटनांनीही केले या निर्णयाचे स्वागत** – ’टी–९’ प्रणालीअंतर्गत प्रत्येक कर्मचाऱ्याची उपस्थिती, अनुभव आणि कामगिरी यांच्या आधारे सॉफ्टवेअरद्वारे नियोजन केले जाते. काही आगारात ही पद्धत प्रायोगिक स्वरूपात राबवण्यात आली असून त्याचे चांगले परिणाम दिसल्याने राज्यभर लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. कर्मचारी संघटनांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# भिवकुंडीतील संत्रा शेतकऱ्याची ‘POG' ब्रँडला देश–विदेशात मोठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० मोर्शी** ,अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील भिवकुंडी गावातील संत्रा उत्पादक शेतकरी नवीनकुमार पेठे यांनी परंपरागत शेतीला आधुनिकतेची जोड देत एक आदर्श उदाहरण उभे केले आहे. संत्रा उत्पादनातून अपेक्षित नफा न मिळाल्याने त्यांनी काही वर्षांपूर्वी स्वतःची संत्रा प्रक्रिया कंपनी स्थापन केली. आज त्यांच्या ‘झजऋ’ या ब्रँडचे संत्रे देशासह विदेशात मोठ्या प्रमाणात निर्यात होऊ लागले असून त्यांच्या उद्योगाने ग्रामीण भागातील इतर शेतकऱ्यांनाही नवे



बाजारपेठेचे दार उघडले आहे.

पेठे यांच्या कंपनीमार्फत दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत आहे. केवळ स्वतःच्या बागेतीलच नव्हे, तर परिसरातील इतर शेतकऱ्यांकडूनही संत्रा खरेदी करून त्यांना योग्य भाव दिला




जातो. त्यामुळे संत्रा उत्पादकांना बाजारभावातील चढ–उतारांपासून मोठ्या प्रमाणात दिलासा मिळत आहे.

त्यांच्या संत्राला दिल्ली, गुवाहाटी, पश्चिम बंगालसह बांगलादेशातूनही मोठी मागणी असून निर्यातद्वारे पेठे यांनी विदर्भातील संत्र्यांना नवी ओळख मिळवून दिली आहे. गुणवत्तेला प्राधान्य आणि सेंद्रिय शेती यावर त्यांनी केलेला भर त्यांच्या उत्पादनांना बाजारात वेगळी प्रतिष्ठा मिळवून देतो. देशातील अनेक नामांकित मॉलमध्येही ‘झजऋ’ ब्रँडचे संत्रे उपलब्ध होत असून ग्राहकांचा प्रतिसाद उत्साहवर्धक आहे.नवीनकुमार पेठे यांची संत्रा प्रक्रिया उद्योगयात्रा आज अनेक तरुण शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. परिश्रम, आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि गुणवत्तेची बांधिलकी यामुळे ग्रामीण भागातूनही मोठ्या उद्योगनिर्मितीची वाट खुली होत असल्याचे त्यांच्या उदाहरणातून स्पष्ट होते.

# नांदगाव पेठमध्ये नाथ समाजाकडून हनुमंत मूर्तीची स्थापना

### गुल्हाने दाम्पत्याला पूजनाचा मान

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२०नांदगाव पेठ** नांदगाव पेठ येथील नाथसमाजाच्या वतीने भोलेनाथ चौकात हनुमंतांच्या सुंदर मूर्तीची स्थापना मोठ्या उत्साहात व धार्मिक वातावरणामध्ये करण्यात आली. या मंगल प्रसंगी नाथसमाजाच्या वतीने भाजपा जिल्हा उपाध्यक्ष विवेक गुल्हाने आणि नांदगाव पेठ जिल्हा परिषद सर्कलमधील उमेदवार मनीषा विवेक गुल्हाने यांना प्रतिष्ठापना व पूजनाचा मान देण्यात आला. गुल्हाने दाम्पत्याने विधीवत स्थापना करून मनोभावे पूजन केले व आशीर्वाद घेतला. यानंतर परिसरातील नागरिकांशी संवाद साधत स्थानिक समस्यांचीही माहिती घेतली. समाजाच्या ऐक्याचे, भाविकांच्या श्रद्धेचे आणि धार्मिक परंपरेच्या जतनाचे प्रतीक म्हणून हा कार्यक्रम विशेष ठरला. कार्यक्रमाला भाजपा महिला



तालुकाध्यक्ष मोनिका पिहुलकर, भाजपा भटक्या–विमुक्त जाती मोर्चाचे उपाध्यक्ष करण मांडोलकर, विश्वनाथ अप्पा शिंदे, जगन्नाथ बोडके, विठ्ठल रामा बोडके, रमेश शिंदे, तानाजी शेगर यांसह महिला मंडळी, भाजप कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या धार्मिक कार्यक्रमामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण पसरले असून नाथसमाजाच्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कपाशीवर 'लाल्या'चे आक्रमण दोन वेचणीतच झाली उलंगवाडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०चांदूर बाजार**

तालुक्यात यंदा कपाशी पिकावर लाल्या रोगाने थैमान घालले आहे. त्यामुळे दोनच वेचणीत पीक संपले असून, प्रति हेक्टर उत्पादन अपेक्षेपेक्षा निम्म्याहून कमी आले आहे. गेल्या वर्षीपेक्षा यंदा कपाशीच्या पेरणी क्षेत्रात काही प्रमाणात वाढ झाली होती.



चांदूरबाजार तालुक्यात काही हजार हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड झाली. मात्र लाल्या रोगामुळे शेतकऱ्यांची सर्व मेहनत पाण्यात गेली. सोयाबीन पिकाने आधीच निराशा केली होती, आता कपाशीनेही तोच मार्ग धरल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले आहेत. बाजारात जरी सध्या ६५०० रुपयांपर्यंत दर मिळत असला, तरी उत्पादन कमी असल्याने खर्च निघणेही कठीण झाले आहे. कपाशी पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव सुरुवातीपासूनच दिसून आला पाने लालसर होऊन झडू लागली, शेंडे कोमेजले आणि बोंडं विकसित होण्याआधीच झाडे सुकू लागली. काही ठिकाणी रोगाचा प्रादुर्भाव एवढा तीव्र आहे की दोनच वेचणीत पिक संपले.

## उत्पन्न घटल्याने खर्चाचा ताळमेळ बिघडला

चांदूरबाजार तालुक्यातील परिस्थिती पाहता, कपाशी उत्पादक शेतकरी दुहेरी आघात सहन करत आहेत. त्यामुळे कपाशी उत्पादकाच्या आत्मविश्वासावर घाला बसत आहे. तालुक्यातील झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्याचे नगदी पीक असलेल्या सोयाबीन पिकाने शेतकऱ्यांच्या स्वप्नावर पाणी फेरले असून शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. त्यातच आता एकीकडे लाल्या रोगाचा प्रादुर्भाव व दुसरीकडे दराचा प्रश्न यामुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. त्यामुळे पहिले सोयाबीन आणि आता कपाशी प्रत्येक पिकाने निराशा केली असल्याने तालुक्यातील शेतकरी खर्चाने हतबल झाला असल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील सहाही महसूल मंडळातील शेतकऱ्यांना प्रति एकर केवळ ३ ते ४ क्विंटल उत्पादन मिळत आहे खते औषधे, मजुरी यावर भरपूर खर्च केला परंतु आता दोनच वेचणीत कपाशीच्या पहाट्या होत असल्याने हातात काही उरले नाही त्यामुळे खर्च निघेल का नाही, हीच काळजी सतावत आहे. कपाशी पिकावर यंदा खर्चात तब्बल वाढ झाली. बियाणे खते, कीडनाशके आणि मजुरीचे दर सर्व वाढले उत्पादन कमी आणि बाजारभाव स्थिर असल्याने उत्पन्न व खर्चाचा ताळमेळ बसत नाही. परिणामी, शेतकरी आर्थिक संकटाच्या भोवऱ्यात अडकला असून शासनाच्या मदतीची चातकाप्रमाणे वाट बघत असल्याचे दिसून येत आहे

# शहरी आरोग्य केंद्र वडाळी येथे आयुक्तांची पाहणी कुष्ठरोग शोध मोहीम रॅलीचे भव्य उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

महानगरपालिकेच्या आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शहरी आरोग्य केंद्र, वडाळी येथे भेट देत केंद्रातील आरोग्य सेवा, राष्ट्रीय कार्यक्रमांची अंमलबजावणी आणि महिला-बाल आरोग्य उपक्रमांचा सखोल आढावा घेतला. त्यांच्या सोबत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर आणि सहायक आयुक्त नितीन बोबडे उपस्थित होते.



कुष्ठरोग शोध मोहीम रॅलीचे आयुक्तांच्या हस्ते उदघाटनभेटीचा प्रारंभ आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते कुष्ठरोग शोध मोहीम रॅलीच्या भव्य उदघाटनाने झाला. नागरिकांमध्ये कुष्ठरोगाविषयी जागरूकता वाढावी, लवकर निदान व्हावे आणि उपचार विलंबित होऊ नयेत, यासाठी ही मोहीम राबवण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

यानंतर आयुक्तांनी शहरी आरोग्य केंद्रात राबविण्यात येणाऱ्या महिला आणि बाल आरोग्य कार्यक्रमांची तपशीलवार माहिती घेऊन प्रगतीचा आढावा घेतला. गरोदर मातांची नियमित तपासणी, प्रसूतीपूर्व व प्रसूतीनंतरचे आरोग्य निरीक्षण, लसीकरण मोहिमेची प्रगती,याविषयी अधिकाऱ्यांशी चर्चा झाली.

आरोग्य केंद्रातील कर्मचारीवर्गाने गरोदर मातांचे रजिस्टर, लसीकरण नोंदी यांची माहिती आयुक्तांना सादर केली. दस्तऐवजांची तपासणी करताना आयुक्तांनी घरगुती प्रसूतीला आळा घालणे आणि अधिकाधिक प्रसूती दवाखान्यात सुरक्षित वातावरणात व्हाव्यात, यावर विशेष जोर दिला. यासाठी आरोग्य कर्मचाऱ्यांनी नागरिकांमध्ये सतत जनजागृती करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

प्रसूतीनंतर महिलांना मिळणाऱ्या जननी सुरक्षा योजनेच्या लाभात कोणताही विलंब होऊ नये, यावरून आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना केल्या. लाभ वितरणात कार्यक्षमता वाढवण्याची आणि प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत योजना पोहोचल्याची खात्री करण्याची जबाबदारी आरोग्य केंद्रास देण्यात आली.

यानंतर आयुक्तांनी राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमाबाबत माहिती घेतली. टीबी रुग्णांची नोंद, तपासणी, औषधोपचार, डॉट्स केंद्राची कार्यप्रणाली याबाबत कर्मचाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.त्यांनी टीबीविषयी भीती दूर करून वेळेत उपचार घेण्याचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचवण्यावर भर देण्याची सूचना केली.आरोग्य केंद्रातील उपलब्ध सेवा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने आयुक्तांनी स्त्रीरोगतज्ज्ञ (गायनॅकॉलजिस्ट) आणि बालरोगतज्ज्ञ (पीडियाट्रिशियन) यांचा पॉलीक्लिनिकमध्ये समावेश करण्याचे आदेश दिले.यामुळे अनेक महिलांना आणि बालकांना तज्ज्ञ उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध होतील आणि नागरिकांना इतरत्र जाण्याचा त्रास कमी होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या विविध मोफत आरोग्य योजनांचे लाभ प्रत्येक गरजू नागरिकाला मिळावेत, यासाठी योग्य मार्गदर्शन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.केंद्रातील आरोग्य कर्मचारी वर्गाने या सर्व योजनांची माहिती देऊन लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी संपूर्ण तयारी दर्शवली.

या संपूर्ण पाहणीदरम्यान स्त्री वैद्यकीय अधिकारी डॉ. मोटघरे, वैद्यकीय अधिकारी डॉ. राम दळवी, डॉ. आयुष वाघे, डॉ. प्रियंका हिवराळे तसेच शहरी आरोग्य केंद्र वडाळी यांचा सर्व स्टाफ उपस्थित होता.अधिकाऱ्यांनी केंद्रातील स्वच्छता, रुग्ण सुविधा, नोंदींची जपणूक आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कार्यपद्धती यांचेही परीक्षण केले.

भेटीचा समारोप करताना आयुक्तांनी सांगितले की, अमरावती शहरातील नागरिकांना उत्कृष्ट आणि सुलभ आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध आहे. प्रत्येक आरोग्य केंद्राने कार्यक्षमतेने काम करून आरोग्य योजनांचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचवणे हीच आपली प्राथमिकता असावी.या पाहणीमुळे शहरी आरोग्य केंद्र वडाळीतील सेवा अधिक सक्षम आणि नागरिकाभिमुख होण्यास निश्चितच मदत होणार आहे.

# वाघाची दहशत वाढली : कळपातून उचलून नेली मेंढी वाघडोह परिसरात तीन दिवसांत दुसरी घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०पथ्रोट**

जंगली डुकराच्या शिकारी नंतर पुन्हा एका हेटीवरील काल सायंकाळी साडेसात वाजताच्या दरम्यान प्रकाश मदने सोनाजी मदने यांच्या हेटीवरील मेंढ्यांच्या कळपातून एक मेढी उचलून नेऊन ठार केली. या घटनेमुळे वाघडोहसह संपूर्ण परिसरातील रहिवासीसह शेतकरी त्या वाघाच्या दहशतीने घाबरून गेले आहे.वराहाचा अर्धवट सोडलेला मृतदेह सोमवारी मध्यरात्री १२ वाजता वाघाने पुन्हा पळवून नेला होता. हा प्रकार ट्रॅप कॅमेरात कैद झाला होता. त्या ठिकाणी दोन ट्रॅप कॅमेरे लावले होते. त्यामध्ये सोमवारी रात्री वाघ हा अधर्वट सोडलेली शिकार घेऊन जात असताना दिसून आल्याचे सदर अधिकाऱ्यांनी सांगितले.त्यानंतर आता पुन्हा एकदा मेंढीची शिकार झाल्याने पशुपालक घाबरले आहेत. याबाबत अधिक नियोजन करण्यासाठी दिनेश




वाळके वनपरिक्षेत्र अधिकारी, सुधीरहाते क्षेत्र सहायक, वनरक्षकए. पी. मुंडे, सय्यद आफताब, आर. आर. बैस, व्ही एस शेरेकर, पी. आर. वानखडे, जे. टी. भारती, ए. बी. गायकवाड, ए. आर. शिरसाम व एस. पी. चौधरी हे वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी सध्या गावात मुक्काम करून परिस्थितीवर नजर ठेवून आहेत. अशातच बुधवारी प्रकाश मदनेयांच्या हेटीवरील कळपातून एक मेंढी वाघाने उचलून नेली.

ज्या ठिकाणी मेंढीची शिकार झाली, त्या ठिकाणी ट्रॅप कॅमेरे लावले आहेत; परंतु शिकारीची पद्धत पाहता ती शिकार बिबट्याने केल्याची शक्यता आहे, तर दुसरीकडे वाघाने डुकराची केलेली शिकार पूर्ण फस्त केलेली आहे. आम्ही त्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. अशी माहिती सुधीर हाते, राऊड ऑफिसर, परतवाडा यांनी दिली.

# राज्यात बिबटे किती, वन खात्याला माहीतच नाही

## नेमका आकडा नोंद नसल्याने त्यावर आळा घालणारी ठोस योजनाही नाही



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नागपूर**

बिबट्यांच्या हल्ल्यांत दगावणाऱ्यांची संख्या मोजली जातेय, मात्र राज्यात नेमके बिबटे किती ही संख्या ना वन खाते सांगू शकते ना राज्य शासन. संरक्षित वन क्षेत्रातील व्याघ्र गणनेत कॅमेराबद्ध होणाऱ्या बिबट्यांची वन खाते नोंद ठेवते, पण जंगलाबाहेर मानवी वस्त्या, शेत, शिवारात गणनेची कोणतीही वैज्ञानिक पद्धत सध्या तरी अस्तित्वात नाही. वन खात्याच्या अंदाजानुसार २०१४ मध्ये राज्यातील बिबट्यांची अंदाजे संख्या ७०० वरून २०२२ पर्यंत २ हजारांच्या घरात गेली आहे.

राज्यात २०१९ पासून आतापर्यंत बिबट्यांच्या हल्ल्यात १२५ जण मृत्युमुखी पडले. बिबट्यांच्या हल्ल्यात बळी गेलेल्यांची संख्या सरकार सांगू शकते, मात्र राज्यात नेमके बिबटे किती याची संख्या मात्र सांगू शकत नाही. कारण, बिबटे मोजण्यांची कोणतीही शास्त्रशुद्ध पद्धत किंवा यंत्रणा सरकारकडे नाही. परिणामी व्याघ्र गणनेत संरक्षित वनक्षेत्रात निदर्शनास येणारी बिबट्यांची संख्या प्रत्यक्षातील बिबट्यांच्या संख्येच्या तुलनेत फारच तोकडी असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे.

# गुरुदेव नगरात नालीच्या बांधकामावरून वादंग कामात अडथळा निर्माण केल्यामुळे पाच जनाविरुद्ध गुन्हा दाखल



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २० तिवसा**

येथील पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या गुरुदेव ग्रामपंचायतमध्ये १५ वित्त आयोगाच्या निधीतून नालीचे बांधकाम मंजूर असताना या कामात अडथळा निर्माण करण्याच्या प्रकरणावरून येथील ग्रामस्थ व ग्रामपंचायत प्रशासना सोबत चांगलाच वादंग निर्माण झाला असून याप्रकरणी पाच जनाविरुद्ध तिवसा पोलीस स्टेशन येथे शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वॉर्ड क्रमांक दोन मध्ये नालीची समस्या लक्षात घेता पंधरावित्त आयोगातील निधीतून नालीचे काम करण्यात येत आहे परंतु येथीलच काहींनी विकासकामांना विरोध केला असून याप्रकरणी तिवसा पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

**वैशाली धुमोने,सरपंच.**

गुरुदेव नगर येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी दिलेल्या तक्रारी वरुन शासकीय विकासकामात अडथळा आणल्याप्रकरणी दोशींवर कलम १८४,प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**गोपाल उपाध्याय पोलीस निरीक्षक तिवसा**

गुरुदेव नगर ग्रामपंचायत येथील वार्ड क्रमांक येथे १५ वित्त आयोग निधीतून दोन लाखाच्या निधी मार्फत नालीचे बांधकाम करण्याचा ठराव ग्रामपंचायत ने घेतला होता. त्यामुळे या नालीच्या बांधकामाची मोजणी तसेच आखणीसाठी सरपंच,उपसरपंच, सदस्य व ग्रामपंचायत सचिव या ठिकाणी उपस्थित असताना येथील काही ग्रामस्थांनी या कामासाठी तीव्र विरोध दर्शविला यावेळी सरपंच यांच्यासोबत वादंग निर्माण झाला त्यामुळे सचिव व सरपंच यांनी तिवसा पोलीस ठाण्यात येऊन शासकीय कामात अडथळा निर्माण करणाऱ्या ग्रामस्थांविरोधात तक्रार दाखल केली पोलिसांनी सचिव व सरपंचाच्या तक्रारीवरून पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदविला असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

# शिक्षक समितीची शिक्षण मंत्र्यांकडे ठोस मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

प्राथमिक शिक्षकांनी १ सप्टेंबर २०१७ पूर्वी TET उत्तीर्ण करण्याबाबतच्या निर्णयामुळे देशभरातील लाखो शिक्षकांवर गंभीर परिणाम होणार असल्याची भूमिका महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने स्पष्ट केली आहे. शासनाने ठरवलेल्या सर्व शैक्षणिक पात्रता शिक्षकांनी पूर्ण केल्या असून, नियुक्तीपूर्वीची आवश्यक प्रवेश परीक्षा देखील उत्तीर्ण केली आहे. अशा परिस्थितीत छउढए च्या अधिसूचनेपूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी ढएढ बंधनकारक करणे अन्यायकारक असल्याचे



समितीचे म्हणणे आहे.

या संदर्भात समितीने ११ नोव्हेंबर रोजी शिक्षणमंत्री दादा भुसे व केंद्रातील शिक्षण मंत्र्यांना निवेदन पाठवून ठढए कायद्याच्या कलम २३ मध्ये दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. राज्य सरकार या प्रकरणी प्रतिवादी असल्याने पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात मर्यादा असून, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून शिक्षकांना न्याय व संरक्षण द्यावे, अशी विनंती राज्य नेते उदय शिंदे, अध्यक्ष विजय कोंबे, सरचिटणीस राजन कोरगावकर आणि प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी केली.

# शिवणगावात सामूहिक श्रमदानातून वनराई बंधारा

## स्मशानभूमीत स्वच्छता अभियान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

मुख्यमंत्री समृद्धी पचायत अभियानांतर्गत शिवणगाव ग्रामपंचायत फत्तेपूर यांच्या संयुक्त विद्यमाने गावातील विकासकामांना चालना देत श्रमदानातून महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. गावालगत वाहणाऱ्या सूर्यगंगा नदीवर वनराई बंधारा उभारण्याचे काम ग्रामस्थांच्या एकजुटीने पूर्ण करण्यात आले. पाणी साठवण वाढविणे, भविष्यातील पाणीटंचाईला प्रतिबंध आणि



शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम अत्यंत मोलाचा ठरणार आहे.यानंतर गावातील स्मशानभूमीत गांजर गवत निर्मूलन करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत परिसर स्वच्छतेला हातभार लावला. दरम्यान ग्रामपंचायतीमार्फत जाहीर करण्यात आले की, घरकर, दिवाबत्ती कर, आरोग्य कर व पाणी कर यापैकीथकीत रकमेवर ५० टक्के सवलत तसेच चालू वर्षाचा पूर्ण कर एकरकमी भरल्यास करमाफी योजना गावात राबविण्यात येणार आहे. या सुवर्ण संधीचा सर्व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा, असे आवाहन सरपंच व सचिव यांनी केले. श्रमदान मोहिमेत सरपंच धर्मराज खडसे, पोलिस पाटील प्रवीण डेहनकर, प्रभाकर खडसे, पप्पू खंडारे, गौरव कुरवाडे, निलेश खबले, निमा इंगळे, अंगणवाडी सेविका कीर्तीकर, वानखेडे, खंडारे, विद्या बारगळ, तसेच ग्रामपंचायत अधिकारी विनोद खडसे यांच्यासह ग्रामस्थ सहभागी झाले होते.

# मुख्यमंत्र्यांचे मामेभाऊ बिनविरोध; चिखलदऱ्यात काँग्रेसच्या उमेदवारासह नऊ जणांची माघार

## आमदार राणांना मुख्यमंत्र्यांनी फोनवरून दिल्या शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

नगरपालिकेच्या निवडणुकीत राजकीय वातावरण तापले आहे. सर्वत्र चढाओढीचे राजकारण पहायला मिळत आहे. एकीकडे, नेते बंडखोरांची मनधरणी करताना दिसत आहेत, तर दुसरीकडे, निवडणूक अविरोध व्हावी, असा प्रयत्नही केला जात आहे. चिखलदरा नगरपालिकेची निवडणूक यावेळी लक्षवेधी ठरली आहे. या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती हे नगरसेवकपदाचे उमेदवार होते. त्यामुळे या निवडणुकीकडे अनेकांचे लक्ष लागले होते. कलोती कुटुंबीयांसाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची ठरली होती.

दरम्यान, आल्हाद कलोती यांच्या प्रभागातून रिंगणात असलेल्या काँग्रेसच्या उमेदवारासह नऊ उमेदवारांनी निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतल्याने आल्हाद कलोती यांच्या अविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला आहे.



चिखलदरा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. काही दिवसांपुर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (अजित पवार गट) चिखलदरा येथील नेते आणि तीन वेळा नगराध्यक्ष राहिलेले राजेंद्रसिंह सोमवंशी यांनी १५ माजी नगरसेवकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. राजेंद्रसिंह सोमवंशी यांना भाजपतर्फे नगराध्यक्षपदाची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे ही निवडणूक सोमवंशी यांच्यासाठी देखील प्रतिष्ठेची बनली आहे.

दरम्यान, आज काँग्रेसचे उमेदवार शेख इर्शाद शेख जमील तसेच नथ्थू खडके आणि नऊ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने आल्हाद कलोती यांची अविरोध निवड झाली आहे. ही सर्वांसाठी आनंदाची बातमी आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून सर्व उमेदवारांनी माघार घेणे पसंत केले. हा दूरदृष्टीचा विजय आहे, असे युवा स्वाभिमान पक्षाचे अध्यक्ष आमदार रवी राणा यांनी सांगितले.

आल्हाद कलोती यांच्या अविरोध निवडीबद्दल आनंद व्यक्त करताना रवी राणा यांनी चिखलदऱ्याच्या विकासाचा थेट संबंध मुख्यमंत्र्यांच्या आवडीशी जोडला. रवी राणा म्हणाले, चिखलदरा हे देवेंद्र फडणवीस यांचे आवडते आणि आपुलकीचे 'हिल स्टेशन' आहे. आल्हाद कलोती निवडून आल्याने येथील विकासाचे चित्र पूर्णपणे बदलणार आहे. कलोती परिवाराने अंध विद्यालय, शैक्षणिक क्षेत्र, तसेच गवळी, आदिवासी, ओबीसी व कलार समाजासाठी केलेल्या भरीव कार्याचा वारसा आल्हाद कलोती पुढे नेत आहेत. 'स्काय वॉक', पर्यटन विकास, रस्ते सुविधा, पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प आणि विद्युत प्रकल्पांसारखे मोठे प्रकल्प कलोती यांच्यामुळेच मार्गी लागतील.

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार रवी राणा यांच्याशी फोनवरून संपर्क साधून त्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी नगराध्यक्षपदाचे उमेदवार राजेंद्रसिंह सोमवंशी आणि आल्हाद कलोती उपस्थित होते.

### चिखलदरा विजयावरून काँग्रेसचा हल्लाबोल
### फडणवीसांवर सपकाळ यांचे थेट आरोप



चिखलदरा नगरपरिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ अविरोध विजयी झाल्यानंतर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र टीका करत सरकारवर गंभीर आरोप केले.सपकाळ म्हणाले, मत चोरी हा पहिला भाग होता; आता उमेदवार चोरी ही दुसरी पायरी सुरू झाली आहे. तिथे वास्तव्यास नसलेल्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत समाविष्ट करणे हे मुख्यमंत्र्यांचे अशोभनीय कृत्य असून याचा तीव्र निषेध असल्याचे त्यांनी सांगितले.त्यांनी आरोप केला की मुख्यमंत्र्यांचे एक मामेभाऊ धर्मदाय आयुक्त असून ते जमिनींची विक्री करतात, तर दुसऱ्याला नगरसेवक बनवून चिखलदराच्या जमिनी खरेदी करण्याचा डाव रचला जात आहे. ही गुंडशाही असून आता ती आम्ही खपवून घेणार नाही, असा सपकाळ यांचा संताप व्यक्त झाला.उमेदवारांना धमक्या, अपहरण, आमिषे, आर्थिक दबाव, तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात असल्याचाही त्यांनी गंभीर आरोप केला. चिखलदरा प्रकरणाचे मुख्य सूत्रधार स्वतः देवेंद्र फडणवीस आहेत, असा थेट आरोप सपकाळ यांनी केला.

### मुख्यमंत्री पदाचा दुरुपयोग, धमक्या व पैशांचा खेळ
### ठाकूरांचा फडणवीसांवर आरोप



चिखलदरा नगरपरिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ अल्हाद कलोती अविरोध विजयी झाल्यानंतर अमरावतीचे राजकीय वातावरण तापले आहे. काँग्रेस नेत्या व माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर थेट आणि गंभीर आरोप केले.

ठाकूर म्हणाल्या, कलोती यांचा पराभव झाला असता तर मुख्यमंत्र्यांची नाचक्की झाली असती. त्यामुळेच त्यांनी या संपूर्ण प्रक्रियेत दमदाटी, धमक्या, पैशांचा वापर आणि गुंडागर्दी केली. मुख्यमंत्री पदाचा खुलेआम दुरुपयोग केला.तिथल्या जमिनीवर मुख्यमंत्र्यांचा डोळा असल्याचाही त्यांनी दावा केला. देवेंद्र फडणवीस हे इतिहासातील सर्वात क्रूर मुख्यमंत्री म्हणून ओळखले जातील. संविधानाची तोडफोड करण्याची पद्धत सुरू आहे, अशी ठाकूरांची टीका होती.भाजपवर हल्ला चढवत त्यांनी म्हटले की, भाजपमध्ये ओरिजनल कमी आणि भाड्याचे लोक जास्त झाले आहेत. कलोतींचा पराभव होऊ नये म्हणून पक्षाने दबाव आणला. शिवाय भाजप आज रवी राणा आणि नवनीत राणा यांच्या खुंट्याला बांधली आहे. या विधानांमुळे चिखलदरा विजयाच्या पार्श्वभूमीवर अमरावतीतील राजकारण आणखी तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

## अमरावतीत मोती नगर चौकात भीषण अपघात; १ गंभीर, ४ जण किरकोळ जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

अमरावतीच्या मोती नगर चौकात गुरुवारी सकाळी सुमारे १०.३० वाजता भीषण अपघात झाला. गोल्डन किड्स शाळेसमोर चक ३४ घ ५२८९ क्रमांकाचे सुसाट चारचाकी वाहन अचानक बेकाबू झाल्याने चालकाचा गाडीवरील ताबा सुटला आणि वाहनाने दुचाकी (चक २७ उड १२१४) तसेच रस्त्यावरून जाणाऱ्या चार जणांना जबर धडक दिली.

या अपघातात निलेश रमेश फाटे हा युवक गंभीर जखमी झाला असून संकेत रमेश फाटे, प्रतीक पांडे, संजय माटे आणि संजय शिरसाठ हे किरकोळ जखमी झाले आहेत. अपघातानंतर संतप्त नागरिकांनी चारचाकी चालकाला पकडून चोप दिला तसेच वाहनाची तोडफोड केली. घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि जमावावर नियंत्रण मिळवत पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

## साम, दाम, दंडाचा वापर वरिष्ठांकडून मनधरणीला वेग

### नाराजांचे बंड शमिवण्याचे चारही ठिकाणी आव्हानच: नेत्यांचीही प्रतिष्ठा लागली पणाला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

शेवटच्या क्षणापर्यंत 'एबी' फार्मची वाट बघून नाराज झालेल्या इच्छुकांनी अखेर बंडाचा झेंडा उभारला. आता अर्ज छाणणीनंतर २१ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी अवघे दोन दिवस उरले असून वरिष्ठ नेत्यांसमोर साम, दाम, दंड, भेदाचा वापर करून नाराजीचा बंड शमविण्याचे आव्हानच उभे ठाकले आहे. यात ते किती यशस्वी होतात, हे कळणार आहे.



तिकीट आपल्यालाच मिळेल,' असा विश्वास ठेवून अनेक इच्छुकांनी जोरदार तयारी केली होती. परंतु, ऐनवेळी तिकीट कापल्या गेली. शेवटच्या क्षणी 'डच्चू मिळाल्याने त्यांचा हिरमोड झाला.. बाहेरून आलेल्यांना किंबहुना पक्षाची प्रमाणिक असलेल्यांना अक्षरशः डावलण्यात आले.

**पक्षापुढे थेट आव्हान**

काही इच्छुकांनी इतर पक्षांचा आधार घेतला. तर काहींनी बंडखोरी करीत अपक्ष उमेदवारी कायम ठेवली. त्यांनी पक्षापुढे थेट आव्हान उभे केले आहे. दरम्यान, नेत्यांकडून मनधरणीचे प्रयत्न सुरू आहेत. आता पक्षातील नेत्यांपुढे आलेले आव्हान कसे पूर्ण होईल याकडेही नगरपालिका क्षेत्रातील सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

**तर मताधिक्क्यावर परिणाम?**

इतर पक्षातील नेते, पदाधिकारी आणि सक्रिय कार्यकर्त्यांना पक्षात प्रवेश दिला. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. नाराज कार्यकर्ते पक्षाचे काम करतील का? नाराज गटामुळे पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या मताधिक्क्यावर परिणाम होण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे. मतदारांमध्ये कोण कुणासोबत आहे याबाबत मात्र मतदारांचा संभ्रम वाढला आहे. दरम्यान माघारीनंतरच नेमके निवडणुकीचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## नाराजी कुणाला भोवणार? पक्षांतर्गत समीकरणांमुळे ताण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

नगरपरिषद निवडणुकीचे अर्ज भरून आता माघारीची प्रक्रिया सुरू झाली आहे. तिकीट न मिळालेल्या इच्छुकांची नाराजी चव्हाट्यावर आली आहे. पक्षांतील निर्णय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह निर्माण करत अनेक दिग्गजांनी अपक्ष उमेदवारीचा पर्याय खुला ठेवला असून, शहरात राजकीय तणावाची नवी लाट उठली आहे.

प्रभागात वर्षानुवर्षे काम करणाऱ्या अनेक स्थानिक कार्यकर्त्यांना तिकीट मिळाले नाही. काहींनी स्पष्टपणे नाराजी व्यक्त करत, आपल्याकडे काडर, जनसंपर्क, कामगिरी असूनही बाहेरच्या व्यक्तीस तिकीट दिलं, असे आरोप केले आहेत. यामुळे ग्राऊंड लेव्हल कार्यकर्त्यांमध्येही असंतोष वाढला आहे.

अनेक नाराजांनी अपक्ष राहून लढण्याचे संकेत दिले आहेत. यामुळे पक्षांच्या गणितावर मोठा परिणाम होणार आहे. पक्ष नेतृत्वावर दबाव वाढला असून, नाराजांना माघारीसाठी तयार करा, असे आदेश वरून आल्याचेही चर्चा आहे.बहुकोणी लढतीमुळे मतविभाजनाचाधोका असल्याने पक्षांनी लगेच संवादाच्या व्यूहनीतीला सुरुवात केली आहे. काही जणांना भविष्यातील पदांचे आश्वासन, तर काहींना प्रभागातील विकास निधी, समिती पदे अशा पर्यायांची ऑफर दिली जात असल्याचे सूत्रांचे म्हणणे.नाराज उमेदवारांच्या समर्थकांनी त्यांच्या बाजूने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. न्याय न मिळाल्यास अपक्षच योग्य, अशीच भूमिका अनेकांनी घेतल्याने तणाव आणखी वाढला आहे.जर नाराज उमेदवार अपक्ष म्हणून रिंगणात राहिले तर काही प्रभागांचा कौल उलटा जाण्याची शक्यता आहे. त्यामळेवरिष्ठ नेते पुढील २४ तासांत महत्त्वाचे निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. नाराजी, बैठका, समझोते, दबाव आणि अपक्ष उमेदवारांची वाढती संख्या. यामुळे निवडणुकीचा माहौल तापला आहे.

## निवडणूक काळात शहरातील बेरोजगारांना आले 'सुगीचे दिवस'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

जिल्ह्यात नगरपरिषद निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा कार्यक्रम नुकताच पूर्ण झाला आहे. आता खरी प्रतीक्षा आहे ती राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या रणधुमाळीची आणि जाहीर सभांची. या धामधुमीची वाट शहरातील हजारो बेरोजगार तरुण आणि रोजंदारीवर पोट भरणारे कामगार आतुरतेने पाहत आहेत.



कारण, निवडणुकीचा हा काळ त्यांच्यासाठी तात्पुरत्या रोजगाराचा मोठा आधार बनला आहे. त्यामुळे प्रचारसभा, रॅलींची या मंडळींकडून प्रतीक्षा केली जात आहे.

**१० ते १५ दिवस रोजगार**

प्रचाराला खऱ्या अर्थाने सुरुवात झाल्यावर पगारी गर्दी जमविणाऱ्या प्रत्येक कामगाराला दिवसाला ३०० ते ५०० रुपयांपर्यंत मानधन दिले जाते. विशेष म्हणजे, प्रचाराच्या या काळात त्यांना दहा ते पंधरा दिवस तरी काम निश्चित मिळते. त्यामुळे निवडणुकीचे काम एक हमीचा रोजगार ठरते.

## सोशल मीडियावर जपून पाऊल टाका, अन्यथा थेट जेलची हवा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

आगामी नगर परिषद निवडणुकांच्या तोंडावर कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी आता सोशल मीडियावर 'कडक वॉच' ठेवला आहे. शांतता आणि सामाजिक सलोखा बिघडवणाऱ्या, जातीय तेढ निर्माण करणाऱ्या किंवा अफवा पसरवणाऱ्या कोणत्याही पोस्टवर शून्य सहनशीलता ठेवत तातडीने कठोर कारवाई करण्याचा सक्त इशारा पोलिसांनी दिला आहे. जनतेने अत्यंत जबाबदारीने सोशल मीडियाचा वापर करावा, अन्यथा जेलची हवा खावी लागेल, अशी ताकीद पोलिस प्रशासनानेदिली आहे.पोलिसांनी त्यांची भूमिका स्पष्ट करताना, केवळ नोटीस देऊन न थांबता, गुन्हा दाखल करण्यासोबतच प्रतिबंधात्मक कारवाईवरही भर दिला जाईल असे स्पष्ट केले आहे. त्वरित कारवाई भडकावू पोस्ट, जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या अफवा किंवा नियमबाह्य सामग्री प्रसारित करणाऱ्यांविरुद्ध कोणताही विलंब न करता त्वरित गुन्हा दाखल करून अटक करण्यात येईल. सत्यता तपासा नागरिकांनी कोणत्याही प्रकारची अफवा किंवा प्रक्षोभक मजकूर फॉरवर्ड करण्यापूर्वी त्याची सत्यता पडताळूनपाहावी आणि संयम बाळगावा. दोषी आढळल्यास कठोर शिक्षेची तरतूद केली आहे.

## बूथस्तरावरची बांधणी मजबूत करून विजय पक्का करा : प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

### धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसची संघटनात्मक आढावा बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण करणारे विचार मांडले.काँग्रेस ही लोकशाही मूल्यांची रक्षणकर्ता आणि जनतेच्या प्रश्नांची खरी लढवैय्या संघटना आहे. बूथस्तरावरची बांधणी मजबूत असेल, तर विजय निश्चित आहे, असे ते म्हणाले

धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघातील काँग्रेस पक्षाची संघटनात्मक आढावा बैठक चांदूर



रेल्वे येथे अत्यंत उत्साहात आणि प्रचंड गर्दीत पार पडली. विशेषतः काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या प्रमुख उपस्थितीमुळे ही बैठक ऐतिहासिक ठरली. मतदारसंघातील सर्व भागांतून आलेल्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून काँग्रेसची संघटनशक्ती आणि आंतरिक एकजूट याची प्रभावी प्रचिती दिली.मंचावर खासदार बळवंत वानखडे, जिल्हाध्यक्ष अनिरुद्ध उर्फ बबलूभाऊ देशमुख, माजी मंत्री यशोमतीताई ठाकुर, माजी आमदार विरेंद्रभाऊ जगताप, जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे यांसह सर्व प्रमुख पदाधिकारी व उमेदवारांची उपस्थिती लाभली.चांदूर रेल्वे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. पूनमताई सूर्यवंशी, धामणगाव रेल्वे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. वर्षा देशमुख, नांदगाव खंडेश्वर नगरपंचायत नगराध्यक्षा पदाच्या उमेदवार सौ. विना जाधव तसेच युवक काँग्रेस प्रभारी अक्षय राऊत उपस्थित होते.खासदार बळवंत वानखडे, श्रीकांत गावंडे व इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी निवडणूक शिस्त, समन्वय आणि संघटनात्मक बांधणीसंदर्भात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. अशोकराव चौधरी यांनी कार्यक्रमाचे शिस्तबद्ध, ऊर्जावान आणि आकर्षक सूत्रसंचालन केले.या बैठकीला गणेश आरेकर, परीक्षित जगताप, श्रीकांत गावंडे, गोविंदराव देशमुख, अमोल होले, पंकज वानखडे, नवीन कनोजीया, प्रदीप मुंदडा, वसंतराव देशमुख, मोहन शिंगवी, संजय शेंडे, अजय तुपसुंदरे, अतुल चांडक, अशोक भैया जयस्वाल, निशु जाधव, अमोल धावसे, कविताताई गावंडे, इद्रिसभाई, अजमतभाई, श्रीनिवास सूर्यवंशी, अक्षय होले यांसह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

महिला सशक्तीकरण, शेतकऱ्यांचे हक्क, युवकांच्या संधी आणि सर्वांगीण विकास हे काँग्रेसचे मुख्य ध्येय आहे, हाच विचार समाजामध्ये पोचून काँग्रेसचे संघटन मजबूत करा व स्थानिक स्वराज्य संस्था तेव्हा झेंडा फडकवा

**माजी मंत्री यशोमतीताई ठाकुर**

आगामी जिल्हा परिषद पंचायत समितीसह नगरपरिषद व नगरपंचायती निवडणुकीवर काँग्रेसचा झेंडा फडकवायचा आहे याकरिता सर्वांनी निर्धार करायला पाहिजे काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता हा या विजयाचा शिलेदार असेल

**जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख**

धामणगाव-चांदूर रेल्वे परिसरात केलेली विकासकामे ही काँग्रेसच्या कार्यपद्धतीची साक्ष आहेत. कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये सतत राहून विश्वास दृढ केल्यास जनता पुन्हा एकदा काँग्रेसलाच साथ देईल,

**माजी आमदार वीरेंद्र जगताप**



आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत